## पंतप्रधान नरेंद्र मोदींची आज परभणीत सभा

**परभणी** : लोकसभा निवडणुकीसाठी परभणीत महायुतीकडून राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर रिंगणात आहेत. त्यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी परभणीत येत असून शनिवारी (दि.२०) त्यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेसाठी परभणी शहरातील पाथरी रस्त्यावरील लक्ष्मी नगरी परिसरात २७ एकर परिसरात भव्य मंडप उभारण्यात आला आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभांचा धडाका सुरू आहे. पुणे जिल्ह्यात समावेश असलेल्या पुणे शहरासह बारामती, शिरूर, मावळ या चार लोकसभा मतदारसंघांतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार आहेत. येत्या २९ एप्रिलला ही सभा पुणे शहराचा मध्यवर्ती भाग अशी ओळख असलेल्या स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या सभेची जय्यत तयारी सुरू आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २७२
www.ramprahar.com

शनिवार, २० एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २







# काँग्रेसच्या पापांचा घडा भरलाय!

## पंतप्रधान मोदींचा वर्ध्यातील सभेत घणाघाती हल्ला






**वर्धा : प्रतिनिधी**

काँग्रेस आणि इंडिया आघाडी नेहमीच विकासविरोधी आणि शेतकरीविरोधी राहिली आहे. त्यामुळेच देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. काँग्रेसच्या काळात जसे काम होत होते, त्यावर मराठीत एक म्हण आहे. बारशाला गेला आणि बाराव्याला आला. काँग्रेसच्या काळात अनेक पिढ्या जात होत्या, पण एखादे काम पूर्ण होत नव्हते. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले. काँग्रेसच्या पापांचा घडा भरला आहे. काँग्रेसला मत म्हणजे मत वाया जाणे, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. ते शुक्रवारी (दि.१९) वर्धा येथील जाहीर सभेत बोलत होते.

महायुतीचे वर्धा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार रामदास तडस आणि अमरावती मतदारसंघाच्या उमेदवार खासदार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा वर्ध्यातील तळेगाव येथे झाली. त्या वेळी ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील भूमीत मराठीत भाषणाला सुरुवात केली.

### महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन

भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी चैत्र एकादशीनिमित्ताने पंढरपूरच्या विठुरायाला वंदन करतो, असे म्हटले तसेच रूप पाहता लोचनी, सुख झाले ओ साजणी या अभंगाची ओळ सादर केली.

काँग्रेस आणि विरोधकांवर हल्लाबोल करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपल्या देशात २०२४पूर्वी नैराश्याचे वातावरण होते. वीज, पाणी, रस्त्यांच्या अनेक गावांत समस्या होत्या. गरिबांना वाटत होते की आपल्या कितीही पिढ्या गेल्या तरी आपली गरीबी हटणार नाही. शेतकऱ्यांना वाटत होते की कितीही कष्ट केले तरी भाग्य बदलणार नाही, परंतु गेल्या १० वर्षांत आपल्या सरकारने २५ कोटी भारतीयांना गरिबातून बाहेर काढले. ५० कोटींहून अधिक बँक खाती नव्याने उघडली गेली आहेत. आता विकसित भारत व महाराष्ट्राचे स्वप्न दूर नाही.

आज आत्मविश्वासाने संपूर्ण देश मोदीची गॅरेंटी पाहतो आहे. मला सर्वांची सेवा करायची आहे. अशी गॅरेंटी द्यायला खूप हिंमत लागते. कितीही अडचणी आल्या तरी मी हे काम करणार आहे. माझ्यासाठी गॅरेंटी ही फक्त तीन अक्षरे नाहीत, ही जबाबदारी आहे. भाजपने आपल्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे की, पुढील पाच वर्षांत तीन कोटी घरे बनवणार. नळाद्वारे प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहचणार आहे. आपल्या कुटुंबातील वृद्ध, आई-वडील यांच्यावरील उपचार खर्चासाठी पाच लाख रुपयांपर्यंतचा खर्च शासन करणार आहे. ज्याप्रमाणे नळातून पाणी येते, तशाच रितीने पाईपमधून गॅस येणार आहे. देशातील प्रत्येक कोपऱ्यात वंदे भारतप्रमाणे रेल्वे धावतील. भारताने चंद्रयान पाहिले, आता गगनयानही पाहणार आहे, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले.

ही लोकसभेची निवडणूक विकसित आणि आत्मनिर्भर भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आहे. आज देश विकसित भारताच्या दिशेने जात आहे. त्यामध्ये वर्ध्याचाही आशीर्वाद पाहिजे, असे आवाहनही पंतप्रधान मोदींनी केले.

### मोदीजींकडून शेवटच्या माणसापर्यंत न्याय -उपमुख्यमंत्री फडणवीस

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सर्वसमावेशक कार्याचे कौतुक केले. मोदीजींच्या नेतृत्वात दीन, दलित, गोर-गरीब, आदिवासी, महिला, ओबीसी, अल्पसंख्याक यांच्या आयुष्यात मुलभूत परिवर्तन झाले. पहिल्यांदा सामाजिक न्याय शेवटच्या माणसापर्यंत न्यायाचे काम त्यांनी केले. सगळ्या समाजाला बरोबर घेऊन पंतप्रधान मोदी पुढे चालले आहेत. आपल्या सगळ्यांचे ठरले आहे अब की बार ४०० पार, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. काँग्रेसची इतकी केविलवाणी अवस्था यापूर्वी कधीही पाहिली नव्हती, जी आता पाहायला मिळते आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.





## लोकशाहीच्या सर्वांत मोठ्या उत्सवाला सुरुवात

# ‘लोकसभे’साठी पहिल्या टप्प्यात राज्यामध्ये ५५.२९ टक्के मतदान

**नागपूर : प्रतिनिधी**

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव समजल्या जाणाऱ्या देशातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीला खऱ्या अर्थाने शुक्रवार (दि.१९) पासून प्रारंभ झाला. पहिल्या टप्प्यात देशभरातील १०२ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. तुरळक प्रकार वगळता मतदान प्रक्रिया शांततेत झाली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने सायंकाळी ६ वाजेपर्यंत झालेल्या मतदानाची आकडेवारी जाहीर केली असून यात ६०.०३ टक्के मतदान झाल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्रातील पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये ५५.२९ टक्के मतदान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रासह २१ राज्यांमधील १०२ जागांवर १६२५ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. महाराष्ट्रातील नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली,



चंद्रपूर या मतदारसंघांत मतदान झाले. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मतदान केंद्रावर कुठलाही अनूचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. नक्षलग्रस्त भागात पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांची अतिरिक्त कुमक मागवण्यात आली होती.

दरम्यान, मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ अशी होती, मात्र गडचिरोली-चिमूर मतदारसंघातील नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सकाळी ७ ते दुपारी ३ या वेळेत मतदान घेण्यात आले. पहिल्या टप्प्यात अनेक नेत्यांचे राजकीय भवितव्य ईव्हीएम बंद झाले आहे. सर्व टप्प्यांतील मतमोजणी एकत्रितपणे ४ जून रोजी होणार आहे.

### दिग्गजांनी बजावला मतदानाचा हक्क

*लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात बड्या नेत्यांनी मतदानाचा हक्क बजावला. नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री व महायुतीचे उमेदवार नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुटुंबीयांसह मतदान केले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनीही नागपूर येथे मतदानासाठी केंद्रावर हजेरी लावली. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष व राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी कुटुंबीयांसह गोंदिया येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.*

## निवडक

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा अर्ज दाखल; जोरदार शक्तीप्रदर्शन

**गांधीनगर** : केंद्रीय गृहमंत्री व भाजप नेते अमित शाह यांनी शुक्रवारी (दि.१९) गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासमवेत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल उपस्थित होते. अर्ज दाखल केल्यानंतर मंत्री शाह यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. ‘विरोधकांचे आरोप बिनबुडाचे आहेत, आम्ही आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. बहुमताचा दुरुपयोग करण्याची परंपरा काँग्रेसचीच आहे, असा घणाघात त्यांनी केला.

### ओडिसाच्या महानदीत बोट उलटून सात जणांचा मृत्यू

**भुवनेश्वर :** ओडिसाच्या महानदीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. झारसुगडात पत्थर सेनी मंदिराजवळ बोट उलटल्याने सुमारे ५० ते ६० प्रवासी पाण्यात पडले. आतापर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले असून ३५ जणांना स्थानिक मच्छीमारांनी वाचविले आहे, तर अद्याप सात ते आठ जण बेपत्ता आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचले. तोवर स्थानिक मच्छीमारांनी त्यांच्या होड्यांद्वारे पाण्यात पडलेल्या बहुतांश लोकांना वाचविले होते.

# केंद्रीय मंत्री नारायण राणेंचा अर्ज दाखल

## महायुतीच्या नेत्यांची उपस्थिती



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांनी शुक्रवारी (दि.१९) आपला उमेदवारी अर्ज रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केला. या वेळी महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने एकत्रत येत भव्य शक्तीप्रदर्शन केले. आपण अडीच लाख मतांनी विजयी होऊ, असा विश्वास उमेदवारी अर्ज भरल्यानंतर माध्यमांशी बोलताना मंत्री राणे यांनी व्यक्त केला.

या वेळी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, उद्योगमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आमदार शेखर निकम, भाजप लोकसभा निवडणूक प्रमुख प्रमोद जठार, शिवसेना नेते किरण सामंत आदी महायुतीचे नेते उपस्थित होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईनद्वारे मंत्री नारायण राणे यांना शुभेच्छा दिल्या. विदर्भात मतदान असल्याने येता आले नाही, पण निवडणूक प्रचारादरम्यान रत्नागिरी-सिंधुदुर्गात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी झालेल्या सभेत बोलताना मंत्री नारायण राणे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संकल्प केला आहे की, भाजप आणि मित्रपक्ष मिळून अब की पार चारशे पार. यासाठी रत्नागिरी सिंधुदुर्गचा खासदार असायला हवा. विकसित भारतासाठी मोदी हॅट्ट्रिक साधत तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील.

शिवसेना नेते किरण सामंत यांनीही रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून मंत्री नारायण राणे यांचे काम करून त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणायचे आहे, असे सांगितले.



## कळंबोलीजवळ एसटी बस आणि कंटेनरचा अपघात

### १८ जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

जव्हार डेपो येथून पंढरपूरच्या दिशेने चाललेल्या एसटी बसचा शुक्रवारी (दि. १९) दुपारी कळंबोली सर्कलजवळ अपघात झाला. या अपघातात चालक व १७ प्रवासी जखमी झाले आहेत.

एसटी बस (एमएच १२-बीटी २०९०) जव्हार ते पंढरपूर अशी जात होती. ही बस दुपारी १२.२०च्या सुमारास कळंबोली सर्कल ते आसुडगाव येथे आली असता कंटेनरला ठोकर मारल्याने अपघात झाला. या अपघातात १८ जण जखमी झाले. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर कंटेनर तेथून निघून गेला, तर क्रेनच्या सहाय्याने एसटी बस बाजूला करण्यात आली आहे. त्यानंतर या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली.

# नवनीत राणांचे संजय राऊतांना जशास तसे उत्तर

**अमरावती : प्रतिनिधी**



अमरावतीच्या खासदार व भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांच्याविषयी बोलताना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांची जीभ घसरली होती. या टीकेला खासदार नवनीत राणांनी खास शैलीत उत्तर दिले आहे.

कोण संजय राऊत? महिला जेव्हा काम करीत असतात तेव्हा त्यांना या सगळ्या गोष्टी सहन कराव्या लागतात. यांच्यासारख्या लोकांनी सीतेलाही तिचे भोग भोगायला लावले. मी अमरावतीची सून आहे. तरीही माझा अपमान केला. संजय राऊतांनी बोलताना ज्या मुलीची लग्नानंतर सासरी पाठवणी केली तिचा विचार करायला हवा होता. ज्या आईच्या पोटातून जन्म घेतला त्या आईचा विचार करायला हवा होता. माझ्यावर टीका करण्याआधी स्वतःच्या पत्नीकडे एकदा बघायचे होते. एखादी महिला सार्वजनिक क्षेत्रात काम करते म्हणजे तिचा स्वाभिमान विकत नाही. नवनीत राणासह अमरावतीतल्या प्रत्येक महिलेचा स्वाभिमान जोडला गेला आहे. संजय राऊत यांनी माझाच नाही, तर प्रत्येक महिलेचा अपमान केला आहे.

खासदार नवनीत राणांचे पती आमदार रवी राणा यांनीही राऊतांना प्रत्युत्तर दिले. संजय राऊत अमरावतीला येऊन गेले व अतिशय खालच्या पातळीवर नवनीत राणांवर टीका केली. जनाब संजय राऊत, अमरावतीला येऊन नवनीत राणांना गाडण्याची भाषा केली. एक लक्षात ठेवा. ही अमरावती आहे. या अमरावतीत तुमच्यासारखे ५६ गाडण्याची ताकद आहे. १४ दिवस जेलमध्ये ठेवून समाधान झाले नाही. परत तुम्ही अमरावतीला येऊन अशी भाषा बोलता. हिंदू शेरनी म्हणून आता नवनीत राणा पुढे आल्या आहेत, असे ते म्हणाले.

# तापमानवाढीमुळे कोकणातील नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातील तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारच्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घ्यावी, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की, शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा.

उष्माघात होऊ नये म्हणून तहान लागलेली नसली तरीसुद्धा जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जाताना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रांत उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे, असेही कोकण विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी म्हटले आहे.



**पनवेल :** अबकी बार चारसो पार करण्यासाठी तसेच मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना पुन्हा एकदा खासदार म्हणून विजयी करण्यासाठी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत वारदोली, ठाकूरवाडी आणि चिंध्रण येथे प्रचार करण्यात आला. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, शिवाजी दुर्गे, सतिश पाटील, वारदोलीचे सरपंच राम भवर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

# पनवेल आणि चिंचवडचे मतदार ठरवणार मावळचा खासदार

## दोन्ही मतदारसंघात तब्बल ११ लाख ६१ हजार मतदार

**पनवेल : वार्ताहर**

रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांत विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज गुरुवारपासून भरण्यास प्रारंभ झाला आहे. या मतदारसंघात महायुतीकडून विद्यमान खासदार श्रीरंग बारणे तर महाविकास आघाडीकडून संजोग वाघेरे यांना उमेदवारी दिली आहे. पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांत विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. त्यापैकी चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक पाच लाख ९५ हजार ४०८ तर पनवलेमध्ये पाच लाख ६५ हजार ९१५ मतदार आहेत. या दोन्ही मतदारसंघांत ११ लाख ६१ हजार ३२३ मतदार आहेत. निवडणुकीत दोन्ही विधानसभा मतदारसंघांतील मतदार निर्णायक ठरणार असून मावळचा खासदार ठरविणार आहेत.

मावळ मतदारसंघातील पिंपरीत तीन लाख ६४ हजार ८०६, चिंचवडमध्ये सर्वाधिक पाच लाख ९५ हजार ४०८, मावळमध्ये तीन लाख ६९ हजार ५३४ तर पनवेलमध्ये पाच लाख ६५ हजार ९१५, कर्जत तीन लाख चार ५२३ आणि उरणमध्ये तीन लाख नऊ हजार २७५ असे २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. त्यात पिंपरी, चिंचवड, मावळमधील १३ लाख २९ हजार ७४८ तर



पनवेल, कर्जत, उरणमधील ११ लाख ७९ हजार ७१३ मतदार असून, पुणे जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात एक लाख ५० हजार जास्त मतदार आहेत.

१३ लाख १० हजार ४३४ पुरुष तर ११ लाख ९८ हजार ८६८ महिला आणि इतर १५९ असे २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. २४ हजार २७८ नवमतदार असून ८५पेक्षा जास्त वय असणारे २२ हजार ३८० तर शंभरपेक्षा जास्त वय असणारे एक हजार ३५८ मतदार आहेत. दोन हजार ५६२ मतदान केंद्र आहेत. त्यात शहरी एक हजार ६९१ तर ग्रामीण भागात ८७१ केंद्र आहेत.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात महिला, युवक, दिव्यांग यांच्याद्वारे संचलित एक, आदर्श सहा असे एकूण २४ विशेष मतदान केंद्र असणार आहेत. तीन हजार ५९४ मतदान यंत्र तर तीन हजार ८१९ व्हीव्हीपॅट उपलब्ध झाले आहेत. मतदानाच्या दिवशी एक हजार २८१पेक्षा जास्त मतदान केंद्रांवर 'वेब कास्टिंग' करण्यात येणार आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत २२ लाख २७ हजार ६३३ मतदार होते. २०२४च्या निवडणुकीसाठी आत्तापर्यंत २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत. त्यामुळे गेल्या पाच वर्षांत दोन लाख ८१ हजार ८२८ मतदारांची वाढ झाली आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी १८ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. आचारसंहिता भंगाच्या ५० तक्रारी निकाली काढल्या आहेत.

मतदारांना उन्हात उभे राहू लागू नये यासाठी मंडप टाकण्यात येणार आहे. पाण्याची सोय केली जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक, गरोदर माता, दिव्यांग नागरिकांना प्राधान्याने मतदान केंद्रात घेतले जाईल. पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रिया पार पडेल, असे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये मतदान जनजागृतीसाठी बचत गटाच्या सभा आणि रॅली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि.१८) तळोजामध्ये बचत गटांमधील महिलांच्या बैठकीमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली, तसेच देवीचा पाडा, मुर्बी गाव, पालेखुर्द, करवले गाव, कळंबोली, लोखंडी पाडा, तक्का गाव याठिकाणी नागरिकांच्या बैठका घेऊन मतदान जनजागृती करण्यात आली. पनवेलमधील ख्वाजानगरी झोपडपट्टी याठिकाणी घरोघरी जाऊन पत्रके देऊन मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची अंमलबजावणी मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदारसंघांतर्गत केली जात आहे. आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व स्वीप पथकप्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप, गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत.

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या वतीने व तहसील कार्यालयाच्या वतीने विविध माध्यमातून मतदान मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदान जनजागृती केली जात आहे. गुरुवारी मतदान जनजागृतीसाठी नवीन तळोजा येथील बचत गटाच्या महिलांची एकत्रित बैठक व रॅली घेण्यात आली. याबरोबरच देवीचा पाडा, मुर्बी गाव, पालेखुर्द, करवले गाव, कळंबोली, लोखंडी पाडा, तक्का गाव याठिकाणी नागरिकांच्या बैठका घेऊन मतदान जनजागृती करण्यात आली.

पनवेमधील ख्वाजानगरी झोपडपट्टी याठिकाणी घरोघरी जाऊन पत्रके देऊन मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली. या वेळी ८५ वर्षांवरील मतदार व दिव्यांग यांच्यामध्येही मतदान जनजागृती करण्यात आली.

# तालुकास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात गव्हाण विद्यालयाचे शितलकुमार म्हात्रे प्रथम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुकास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील उपक्रमशील विज्ञान शिक्षक शितलकुमार हसुराम म्हात्रे यांना शिक्षक प्रतिकृती गटात जाऊ आलेखाच्या जगात या प्रतिकृतीबद्दल प्रथम क्रमांकाचे सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन बक्षीस वितरण सोहळा पंचायत समिती सभागृह पनवेल येथे झाला. या वेळी गटविकास अधिकारी भोये तसेच गटशिक्षणाधिकारी मोहिते यांच्या हस्ते विजेत्या शिक्षकांचा



सन्मान करण्यात आला.

जाऊ आलेखाच्या जगात या प्रतिकृतीत आलेखावर आधारीत विविध शैक्षणिक साहित्य, उपक्रम, खेळ यांचा सुरेख मेळ, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, वेळेची बचत आदी वैशिष्ट्यांमुळे ही प्रतिकृती विद्यार्थीप्रिय ठरेल.

हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीनेही शितलकुमार म्हात्रे यांना प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आदींच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी जुनियर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, राजू खेडकर, माणिक घरत, जयवंती ठाकूर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ अध्यापिका चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, गणेश भोईर, प्रशांत परदेशी, द्रौपदी वर्तक, प्रणाली पाटील, योगिता पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, चारुशीला ठाकूर, सारिका ठाकूर, वृषाली म्हात्रे, संपदा म्हात्रे, उज्ज्वला म्हात्रे, सुजाता चौधरी, उर्मिला गोंधळी, अपर्णा देवकुळे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, धनाजी ठाकूर, अरुण कोळी, दयानंद खारकर आदी उपस्थित होते.

# खारघरमधील सोसायटीत महिलेला धक्काबुक्की

**पनवेल** : खारघरमधील शिवशंकर टॉवर इमारतीमध्ये पार्किंगच्या मुद्यावरून महिलांमध्ये वाद झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. बांधकाम व्यावसायिकाच्या काही महिलांनी रहिवाशी महिलांना धक्काबुक्की करीत जोरजोरात भांडण करीत असल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे.

बांधकाम व्यावसायिकाने महिला बाऊन्सरना बोलावून सदनिकाधारकांना पार्किंगमध्ये जाण्यास बंदी केल्यामुळे वाद विकोपाला गेला आणि बांधकाम व्यवसायिकाच्या महिला बाऊन्सर आणि रहिवाशी महिला यांच्यामध्ये धक्काबुक्की करीत जोरजोरात आरडाओरडा करीत भांडण झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

# लग्न जुळविण्याच्या साईटवरून तरुणीची फसवणूक

### आरोपीला श्रीवर्धनमधून अटक

**पनवेल : वार्ताहर**

विवाहित असतानादेखील लग्न जुळविण्याच्या साईटवरून विवाहेच्छुक तरुणींना लग्नाचे अमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळणाऱ्या नबील मुनीर खान (३०) याला खारघर पोलिसांनी श्रीवर्धन येथून अटक केली आहे.

पोलिसांनी बँकेचे अधिकारी बनून त्याच्या घरी जाऊन त्याला अटक केली. या भामट्याने अनेक तरुणींची फसवणूक केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांकडून त्याची अधिक चौकशी करण्यात येत आहे.

आरोपी नबील मुनीर खान विवाहित असतानादेखील त्याने काही महिन्यांपूर्वी मेट्रीमोनीयल साईटवर लग्नासाठी आपली माहिती टाकली होती. त्यानंतर त्याने साईटवरून खारघर येथील २८ वर्षीय तरुणीसोबत ओळख वाढवली. या तरुणीला त्याचा दक्षिण आफ्रिकेत मायनिंगचा तर मुंबईतील डोंगरी भागात टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असल्याचे सांगून तिचा विश्वास संपादन केला. नबीलने वेगवेगळी कारणे सांगून तरुणीकडून तब्बल सहा लाख ३१ हजार उकळले होते, मात्र त्यानंतरदेखील नबीलकडून पैशांची मागणी सुरूच राहिल्याने तरुणीला संशय आला. त्यामुळे या तरुणीने त्याच्याकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. त्याने टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे या तरुणीच्या लक्षात आल्यानंतर तिने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे या आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली होती.

यादरम्यान आरोपी नबील हा श्रीवर्धन येथे आपल्या गावी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतुल आहेर, पोलीस कॉन्स्टेबल किरण पाटील, पोलीस नाईक मच्छिंद्र खेडकर, पोलीस शिपाई नितीन जावरे यांच्या पथकाने श्रीवर्धन गाठून आरोपीला बेड्या ठोकल्या.

# पनवेल एसटी डेपो परिसरातील पाणपोई पुन्हा सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल एसटी डेपो परिसरातील सोनबा येलवे पाणपोई बरीच वर्षे बंद होती. याबाबत माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष रावसाहेब खरात यांनी महापालिकेकडे पाठपुरावा करून पाणपोई सुरू करण्यात आली.

सध्या उन्हाळा सुरू असून लोक उन्हाने हैराण झाले आहेत. गोरगरीब जनतेला थंड पाणी



मिळावे आणि सोनबा येलवे यांच्या कार्याचा इतिहासात उल्लेख आहे. त्यामुळे सोनबा येलवे यांच्या नावाने महापालिकेतर्फे पाणपोई उभारण्यात आली होती, मात्र ती अनेक वर्षे बंद होती. ती सुरू करण्यासाठी अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष रावसाहेब खरात यांनी पनवेल महापालिकेकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला.

पनवेल महापालिकेने त्वरीत दखल घेऊन पाणपोई स्वच्छ करून पिण्याच्या पाण्याची थंड मशिन बसवून पाण्याची लाईन सुरू केली. भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर यांनी यासाठी सहकार्य केले.

# पनवेलमध्ये दोन अपघातात एक ठार, एक जखमी

**पनवेल** : पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एकजण ठार व एकजण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

कमलेश मराठे हे (एमएच ४६ सीक्यू ३८६३) या स्कुटीने खांदा कॉलनी सिग्नल इथून पनवेल येथे जात होते. एक कंटेनर त्यांच्यापुढे निघाला. कंटेनरच्या बाजूने ब्रिजवरून जात असताना रात्री कंटेनरने अचानक उजव्या बाजूला वळण घेतले. या वेळी स्कुटीचा आरसा कंटेनरच्या पुढील चाकाला लागला. त्यामुळे स्कुटी खाली पडली व कमलेश मराठे खाली पडले. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय, पनवेल त्यानंतर एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे उपचार सुरू आहेत. कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या अपघातात रात्री बेलपाडा मेट्रो स्टेशनसमोरील पनवेलकडून सीबीडी बेलापूरकडे जाणाऱ्या लेनवर सेक्टर एक, खारघर येथे चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालवले आणि पायी चालत जाणाऱ्या रिजवान साबीर अली शहा याला धडक मारून अपघात केला. त्याला उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.






पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रासप, आरपीआय महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी भाजपचे तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत चिंध्रण व वारदोली, ठाकूरवाडी येथे प्रचार करण्यात आला. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, शिवाजी दुर्गे, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, सतीश पाटील, वारदोलीचे सरपंच राम भवर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनेवल : महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १७ येथील सीकेटी शाळेसमोर खड्डे पडले होते. याबाबत माजी नगरसेविका सुशीला घरत आणि भाजप वारियर्स जगदीश घरत यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे महापालिकेला खड्डे भरण्याच्या सूचना करण्याची मागणी केली होती. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेत माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेला कळवून त्वरीत खड्डे भरून रस्त्याची डागडुजी करण्याच्या सूचना केल्या. महापालिकेने खड्डे भरण्यास सुरुवात केली. याबद्दल नागरिकांनी आभार मानले आहेत.**





## संपादकीय


# पाकिस्तानची साखरपेरणी

पाकिस्तानमधील राजकीय नेते अधुनमधून भारतासंदर्भात गोड-गोड विधाने करतात, परंतु त्या देशाचे धोरण मात्र दुसऱ्याच दिशेने जाते. स्वाभाविकच त्यामागे त्यांचा हेतू निव्वळ देशातील अंतर्गत राजकारणाचा भाग म्हणून आभासी सकारात्मक चित्र उभे करण्याचा तर नाही ना, हे भारताला तपासून घ्यावे लागते.

**भारतात सध्या लोकसभा निवडणुकीचे वातावरण आहे. शुक्रवारी निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानही पार पडले. एकीकडे भारतात निवडणुकीमुळे वातावरण तापलेले असताना पाकिस्तानकडून उभय देशांतील संबंध सुधारण्याची शक्यता वर्तविली जाते आहे. निवडणुकांनंतर दोन्ही देशांतील संबंध सुधारतील असा दावा पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या महिन्याच्या प्रारंभीच केला होता. त्यापाठोपाठ आता पाकिस्तानातील पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री व त्या देशाचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या कन्या मरियम शरीफ यांनीही भारताशी संबंध सुधारण्याची भाषा केली आहे. बैसाखीच्या निमित्ताने पाकिस्तानातील कर्तारपुरसाहिब येथे गेलेल्या शीख भाविकांसमोर बोलताना मरियम शरीफ यांनी आपले पिता नवाज शरीफ यांच्या विधानाचे स्मरण करून आपल्या देशाने शेजाऱ्यांशी झगडता कामा नये असे मत व्यक्त केले. यावेळी प्रथमच बैसाखीचा सण पाकिस्तानात सरकारी पातळीवर साजरा होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पाकिस्तानकडून भारताशी संबंध सुधारण्याविषयीचे संकेत का दिले जात असावेत याचा विचार नीट जोखून केला जाण्याची गरज आहे. भारताची शेजारी राष्ट्रांविषयीची भूमिका कायमच मित्रत्वाची राहिली असली तरी तिथल्या राजकीय नेत्यांच्या विधानांना तपासून घ्यावे लागते. पाकिस्तानात गेल्याच महिन्यात माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लिम लीग (नवाज) आणि असीफ अली झरदारी, बिलावल भुट्टो यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टी यांचे आघाडी सरकार सत्तेवर आले आहे. असीफ अली झरदारी हे पाकिस्तानच्या दिवंगत माजी पंतप्रधान बेनझीर भुत्तो यांचे पती तर बिलावल भुत्तो हा त्यांचा मुलगा आहे. तेथील सार्वत्रिक निवडणुकीत माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या 'तेहेरीक-ए-इन्साफ पक्षा'चे उमेदवार निवडणुकीत अपक्ष लढले होते व त्यांनीच सर्वाधिक जागा जिंकल्या. परंतु शरीफ व भुत्तो यांच्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले. पाकिस्तानातील राजकारणात लष्कराची भूमिका नेहमीच प्रबळ राहिली आहे हे जगजाहीर आहे. त्यामुळेच आता पाकिस्तानातील सत्ताधाऱ्यांकडून भारताशी संबंध सुधारण्याची भाषा होऊ लागल्यानंतर त्याकडेही त्याच दृष्टिकोनातून पहावे लागेल. शिवाय पाकिस्तान आणि चीनचे साटेलोटे कायमच भारत-पाकिस्तान संबंधात अडथळा ठरत आले आहे हेही दुर्लक्षून चालणार नाही. पाकिस्तानची भारताविषयीची सगळी धोरणे तिकडून प्रेरित होऊन येतात हे लपून राहिलेले नाही. अर्थव्यवस्था पार कोलमडलेला पाकिस्तान चीनच्या प्रचंड कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. भारताने कायमच शेजारी राष्ट्रांबरोबरच्या संबंधात सकारात्मक भूमिका घेतली. पण पाकिस्तानी लष्कराने हे प्रयत्न हाणून पाडले. चीनचीही या भारतविरोधी भूमिकेला कायम फूस राहिली आहे. लष्कराच्या प्रभावाखाली पाकिस्तानने कायम दहशतवादाला पोसण्याचीच भूमिका घेतली. पंजाब आणि काश्मीर या दोन्ही राज्यांमध्ये सीमेपलीकडून दहशतवाद्यांनी घुसखोरी केली. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांचे संबंध आणखीन बिघडले. काश्मीरबाबतही पाकिस्तानने नेहमीच भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर अडचणीची ठरेल अशी भूमिका घेतली. एकीकडे या सगळ्या भारतविरोधी कारवाया करतानाच अधुनमधून या देशाचे नेते मैत्रीची भाषा बोलतात हे भारताला सवयीचे आहे. त्यामुळेच या महिन्यात पाकिस्तानी नेत्यांकडून करण्यात आलेल्या विधानांकडे तोलून-मापूनच बघावे लागेल.**

# तृतीयपथीयांनाही पंतप्रधान मोदींबद्दल विश्वास





लोकसभा निवडणुकीत पुरुष व महिला मतदारांची २००९पर्यंत स्वतंत्र नोंद केली जात होती, मात्र तृतीयपथीयांची वेगळी नोंद नव्हती, परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने २०१४च्या निवडणुकीत पहिल्यादाच तृतीयपंथी अशी तिसरी वर्गवारी करण्यात आली. सध्या लोकसभा निवडणुकीसाठी पनवेल विधानसभा मतदारसंघात ८९ तृतीयपंथी मतदार आहेत. त्यापैकी अनेक नवनाथ नगर आणि पंचशील नगरमध्ये राहतात. आश्रय फाउंडेशनच्या कार्यालयात त्यांची भेट झाली असता निवडणुकीबाबत त्यांची मते जाणून घेण्याची संधी मिळाली.

आराधना शिंदे मनमाडची. सात-आठ वर्षांपूर्वी मुंबईत आली. या वेळी ती पहिल्यांदाच मतदान करणार आहे. ती म्हणते, मतदान कार्ड काढताना खूप अडचणी आल्या, कारण सुरुवातीला आम्ही वेगळ्या जेंडरमध्ये होतो. त्यानंतर आम्ही तृतीयपंथी असल्याचे लक्षात आल्यावर आमच्या आधार कार्ड व पॅन कार्डमध्ये बदल करावा लागला. त्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. मला मतदान कार्ड तयार करण्यासाठी आश्रय फाउंडेशनने मदत केली. आता आपण मतदान करू शकतो याचा आनंद आहे. आम्हाला शासनाकडून आमची जी गरज आहे त्यासाठी लागणारी मदत मिळावी असे वाटते. आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी खूप काही दिले असं वाटतंय. त्यांचे सरकार आल्यावर आम्हाला अनेक सवलती मिळाल्या. मी गावाकडे बारावी केले आहे आयटीआय मध्ये मेकॅनिकलचा एक वर्षाचा कोर्स केला आहे. मला नोकरी नोकरी मिळावी असं वाटते. सरकारने आम्हाला द्यावी असं मला वाटतं. रस्त्यात एक एक रुपया मागण्याची लाज वाटते. शासनाने नोकरी दिल्यास आम्ही पैसे मागत फिरणार नाही. आम्हाला पेन्शन दिल्यास आमच्या अनेक अडचणी सुटू शकतात. त्यासाठी मी पंतप्रधान मोदींना मत देणार आहे.

अनन्या पवार चौथीपर्यंत शिकलेली. पनवेल महापालिका हद्दीतील रोडपाली बौद्धवाडीची रहिवाशी आहे. आश्रय फाउंडेशनमध्ये आल्यावर मला आवश्यक असणारे कागदपत्रे पूर्ण होऊन माझी चांगली सुरुवात झाल्याचे सांगते. अशोक गायकवाड सर, शिल्पा मॅडम, मनीषा मॅडम यांच्यासोबत राहून त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे, कारण आपल्यासाठीही कोणी तरी आहे याची खात्री पटली. चार लोकांनी स्वीकारून फायदा नाही, पण आम्हाला सर्व समाजाने स्वीकारले पाहिजे असे वाटते. माझ्या गावात मला स्वीकारत नाहीत, नावे ठेवतात. मला देवाची आवड असल्याने मी देवाचा गोंधळ, जागरण असे कार्यक्रम करीत असते. मला लावणी, नाचायची आवड आहे. त्यासाठी मेकअप करण्याची सवय झाल्याने केशरचना व छोटी मेकअपची कामेही करते. मी २३ वर्षांची आहे, पण माझ्याकडे मतदान ओळखपत्र नव्हते. आता मला आश्रय फाउंडेशनमुळे मिळाले आहे. महापालिकेतील समाजकल्याण विभागाच्या स्वप्नाली चौधरी मॅडमनी आम्हा तिघींना पिंक रिक्षा देण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठवला आहे. रिक्षा मिळाल्यास आम्ही पैसे मागत फिरणार नाही.

पहिल्यांदाच मतदान करणार आहे. त्यामुळे आज जगाने आम्हाला स्वीकारायला सुरुवात केली आहे असे वाटते. त्याचा आनंद झाला आहे. तुम्ही प्रत्येकाने आम्हाला स्वीकारा. आम्हीही कोणत्या तरी आईच्या पोटी जन्म घेतला आहे. त्यामुळे आम्हालाही तुमच्यासोबत जगण्याचा हक्क असल्याचे ती सांगते. आजपर्यंत कार्यकर्ते आमच्यापर्यंत पोहचले नाहीत. कोणाला मत द्यावे याचा मी विचार केला नाही, मात्र मतासाठी पैसे घेणार नाही. आम्हाला माणूस म्हणून साथ देईल, आमची कामे करेल त्यालाच मत देईन.

सानिया जाधव ही औरंगाबादची. कला शाखेत बारावी पास आहे. तिला पुढे शिकायचे होते, पण कुटुंबाला अशी असल्याचे माहिती झाल्याने त्यांची साथ मिळाली नाही. घरातून बाहेर पडल्यावर तर कोणाचीच साथ नाही. उलट घरच्यांनी अशी वागते म्हणून पोलीस केस केली होती, पण तिने पोलिसांना सांगितले मी १८ वर्षांची आहे. मला मुलींचे कपडे घालून सुरक्षित वाटते. मी मुलीसारखीच वागणार. मग घर सोडून गुरूकडे गेली. त्यांनी सहारा दिला. २०१४मध्ये पनवेलला आले. ती म्हणते रोजच्या जीवनात आम्हाला हात जोडणारेही भेटतात आणि हात ओढणारेही भेटतात, पण आश्रय फाउंडेशन आम्हाला आमचे मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न करीत आहे. मला आणि माझ्या मैत्रिणीला सवलत मिळून हॉटेल व्यवस्थापनाच्या कोर्सला प्रवेश मिळावा म्हणून गायकवाड सर आणि स्वप्नाली मॅडम प्रयत्न करीत आहेत.

पंतप्रधान मोंदीनी आमच्यासाठी अनेक योजना आणल्या. आता आम्हाला काम मिळाले पाहिजे. आम्ही घर सोडून आलो आहोत. मग पुन्हा आम्ही आमचे दुसरे रूप घेऊन घरी जाणे शक्य नाही. आमच्याकडे आधार कार्ड, पॅन कार्ड व ट्रान्सजेंडर कार्ड असताना पुन्हा दुसऱ्या पेपरसाठी अडवणे चुकीचे वाटते. त्याबाबत शासनाने जीआर बदलणे गरजेचे आहे. म्हणजे आम्हाला सुकर होईल, असेही सानियाने नमूद केले.

**-नितीन देशमुख, पनवेल**

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष



पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगलादेश) येथे झाला. पन्नालाल घोष यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारवादक होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४मध्ये त्यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८मध्ये पन्नालाल घोष यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती यांच्याकडे १९३९मध्ये आणि पुढे १९४७च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे पन्नालाल घोष यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६पर्यंत बासरीवादक होते. या काळात त्यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६पासून पन्नालाल घोष ते वाद्यवृंद निर्देशक होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. पन्नालाल घोष यांनी बासरीत आमूलाग्र परिवर्तन घडविले. बासरीची लांबी ४०-४२ इंचांपर्यंत वाढविली तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल घोष यांचा फार मोठा वाटा होता. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**

## बदलते तंत्रज्ञान

### प्रत्येक स्मार्टफोनचा कॅमेरा डाव्या बाजूलाच का असतो?



पूर्वी 'रोटी, कपडा और मकान' या मानवाच्या तीन मुलभूत गरजा होत्या. पण, गेल्या काही वर्षांपासून स्मार्टफोनदेखील मानवाची गरज बनला आहे. दूरवर बसलेल्या प्रियजनांशी बोलण्यासोबतच, बरीचशी दैनंदिन कामेही या मोबाईलच्या मदतीने काही मिनिटांत पूर्ण होतात. बहुतांश स्मार्टफोन्सची बेसिक डिझाईन सारखीच असते. प्रत्येक मोबाईलला समोर एक कॅमेरा, पाठीमागे दोन किंवा तीन कॅमेरे असतात. तुम्ही कधी विचार केलाय का, हे कॅमेरे मोबाईलच्या डाव्या बाजूलाच का असतात, उजव्या बाजूला का नसतात? त्यामागे एक खास कारण आहे...

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात जवळपास सर्वांकडेच स्मार्टफोन आहे. इंटरनेटच्या या युगात स्मार्टफोनशिवाय जीवन जगणे कठीण झाले आहे. आता आपण जाणून घेऊया की, स्मार्टफोनमधील कॅमेरा डाव्या बाजूला का असतो. तुम्हाला आठवत असेल. सुरुवातीला बहुतांश लोकांकडे छोटे फीचर फोन असायचे, नंतर हळूहळू स्मार्टफोन बाजारात आले. या फोन्समध्ये कॅमेरा मध्यभागी होता, पण नंतर सर्व कंपन्यांनी कॅमेरा मोबाईलच्या डाव्या बाजूला वळवला.

**आयफोनपासून सुरुवात**

दिग्गज स्मार्टफोन कंपनी ॲपले सर्वप्रथम आपल्या आयफोनमध्ये डाव्या बाजूला कॅमेरा देण्यास सुरुवात केली होती. यानंतर, हळूहळू बहुतांश कंपन्यांनी हाच पॅटर्न स्वीकारला आणि कॅमेरा फोनच्या डाव्या बाजूला शिफ्ट केला. कॅमेरा डाव्या बाजूला ठेवणे, हे डिझाईन नसून त्यामागे खूप रंजक कारण आहे.

**डाव्या बाजूच्या कॅमेराचे कारण**

जगातील बहुतांश लोक डाव्या हाताने मोबाईल वापरतात. अशा स्थितीत मोबाईलच्या मागे डाव्या बाजूला बसवलेल्या कॅमेराने फोटो काढणे किंवा व्हिडीओ काढणे सोपे जाते. याशिवाय मोबाईल फिरवून लँडस्केप मोडमध्ये फोटो काढताना मोबाईलचा कॅमेरा वरच्या बाजूला राहतो, त्यामुळे लँडस्केप मोडमध्येही फोटो सहज काढता येतो. या कारणांमुळे मोबाईलमधील कॅमेरा डाव्या बाजूला ठेवला जातो.

# आद्य इतिहास संशोधक चिं.वि. वैद्य



**निमित्त**

चिंतामण विनायक वैद्य हे संस्कृत भाषेतील विद्वान होत. ते एक थोर ज्ञानोपासक, महाभारत-रामायणाचे संशोधक, मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण-महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

१८ ऑक्टोबर १८६१मध्ये कल्याणमध्ये त्यांचा जन्म झाला. चिंतामण विनायक वैद्य हे संस्कृत भाषेतील विद्वान होत. ते एक थोर ज्ञानोपासक, महाभारत-रामायणाचे संशोधक, मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण-महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला. आज त्यांची जयंती. १८ ऑक्टोबर १८६१ रोजी कल्याणमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विनायकराव हे वकील होते. ते कल्याणमध्येच वकिली करत. कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात चिंतामणरावांचे शिक्षण पार पडले. १८८२मध्ये एमएची पदवी मिळवल्यानंतर १८८४मध्ये त्यांनी एलएलबीची पदवी संपादित केली. त्यानंतर कोल्हापूरमधील शिरोळ येथे त्यांनी काही काळ मुनसफ म्हणून नोकरी केली. त्यानंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर उज्जैन येथे न्यायाधीश पदावर ते रुजू झाले.

१८९५ ते १९०४ या कालावधीत त्यांनी ग्वाल्हेरच्या सरन्यायाधीशपदाची जबाबदारी पार पाडली. १९०५मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी लोकमान्य टिळकांसोबत राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेतले. कोलकाता, सुरत आदी ठिकाणी काँग्रेसच्या अधिवेशनांना ते टिळकांसोबत गेले. टिळकांच्या निधनानंतर त्यांनी महात्मा गांधीजींसोबत कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी निष्ठेने आणि आस्थेने राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य केले. काही कालावधीनंतर चिंतामणरावांनी राजकारण सोडले. १८८९ ते १९३४ या कालावधीत वैद्यांनी विपुल लेखन केले. केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांमधून त्यांचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले. त्यांचे एकूण २९ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

यामध्ये ९ इंग्रजी आणि २० मराठी ग्रंथांचा समावेश आहे. महाभारत-ए क्रिटिसिझम (१९०४), संक्षिप्त महाभारत (१९०५), रिडल ऑफ रामायण (१९०६), अबलोन्नतिलेखमाला (१९०६), एपिक इंडिया (१९०७), मानवधर्मसार -संक्षिप्त मनुस्मृति (१९०९), दुर्दैवी रंगू (१९१४), श्रीकृष्ण चरित्र (१९१६), महाभारताचा उपसंहार (१९१८), हिस्टरी ऑख मिडिव्हल हिंदु इंडिया (३ खंड, १९२१, १९२४ व १९२६), संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास (१९२२), मध्ययुगीन भारत (तीन खंड, १९२५), गझनीच्या महमूदाच्या स्वार्या (१९२६), ए हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर (१९२६), वैद्यांचे ऐतिहासिक निबंध (१९३१), शिवाजी द फाउंडर ऑफ मराठा स्वराज (१९३१), हिंदू धर्माची तत्त्वे (१९३१), महाभारताचे खंड - सभापर्व, विराटपर्व, उद्योगपर्व (१९३३-३५), संयोगिता नाटक (१९३४) हे त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांपैकी काही ग्रंथ आहेत. चिं.वि. वैद्यांच्या 'महाभारत ए क्रिटिसिझम' या इंग्रजी ग्रंथावर लोकमान्य टिळकांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहिले. याद्वारे चिं.वि. वैद्य यांच्या ग्रंथांची मौलिकता स्पष्ट होते.

१९०८मध्ये पुणे येथे भरलेल्या सहाव्या मराठी साहित्य (ग्रंथकार) संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. २० एप्रिल १९३८ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : तन्वी पवार)



**खारघर : उष्णतेच्या झळा हल्ली सकाळपासूनच बसत असल्याने मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झाली आहे.**

## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात दररोज लिंबूपाणी पिण्याचे फायदे!

जेवणात आंबट काही मिळाले तर जेवणाची चव आणखी वाढते. अशा वेळी लिंबू हा उत्तम पर्याय आहे. आपण कोशिंबीरमध्ये किंवा थेट लिंबू मिसळून देखील खाऊ शकता. लिंबामध्ये अनेक नैसर्गिक गुणधर्म आढळतात. हे व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, फोलेट आणि पोटॅशियम सारख्या पोषक तत्वांचे पॉवरहाऊस आहे, जे त्वचेच्या आरोग्यासाठी शरीराच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. उन्हाळ्यात रोज लिंबाचे सेवन केल्यास शरीराशी संबंधित अनेक समस्या दूर होतात. आज आम्ही तुम्हाला लिंबूपाणी पिण्याच्या फायद्यांविषयी सांगणार आहोत.



**वजन कमी करण्यास उपयुक्त**

लिंबामध्ये पेक्टिन असते आणि त्याचा रस पिऊन आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे आपले वजन कमी करण्याच्या प्रयत्नांना अधिक फायदा होऊ शकतो. लिंबू वजन कमी करणे आणि चरबी कमी करण्यास देखील मदत करते.

**ऊर्जा पुरवते**

लिंबामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. व्हिटॅमिन सी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. याशिवाय व्हिटॅमिन सी शरीरातील पांढऱ्या रक्तपेशींचे उत्पादन वाढविण्यास मदत करते, ज्यामुळे संक्रमण आणि रोगांपासून शरीराचे संरक्षण होण्यास मदत होते.

**पोटासाठी चांगले**

लिंबाची साल आणि लगद्यामध्ये पेक्टिन नावाच्या विद्रव्य फायबरचे प्रमाण भरपूर असते. हे यकृतामध्ये पाचक एंजाइम तयार करण्यास प्रोत्साहित करते, जे शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

**रक्तातील साखर नियंत्रणात ठेवते**

उच्च फायबर असलेल्या फळांमुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते. याशिवाय यामुळे मधुमेहाचा धोकाही कमी होतो. मधुमेह असलेल्या लोकांसाठीही हे फायदेशीर ठरू शकते.

**बेस्ट अँटीऑक्सिडंट**

फ्री रॅडिकल्सपासून आपले संरक्षण करण्यासाठी अँटीऑक्सिडंट्स हे एक महत्वाचे कंपाऊंड आहे. जास्त प्रमाणात मुक्त रॅडिकल्स आपल्या पेशींचे नुकसान करण्यासाठी जबाबदार असतात आणि हृदयरोग, मधुमेह आणि अनेक प्रकारच्या कर्करोगासारख्या तीव्र परिस्थितीस कारणीभूत ठरू शकतात.

# उष्णतेच्या लाटेत भारनियमनाची भर

## अनेक ठिकाणी होतेय बत्ती गूल; नागरिक हैराण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उष्णतेच्या लाटेमुळे सध्या जिल्ह्यामधील नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे उष्म्यामध्ये अधिक भर पडत आहे. कधीकधी दिवसभर गेलेली वीज रात्री तीन-चार तासांसाठी येते. मान्सूनपूर्व दुरूस्ती, झाडांच्या छाटणीच्या कामामुळे वीजपुरवठा खंडित करत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येत आहे.

जिल्ह्यात काही दिवसांपासून ३८ ते ४० अंश इतक्या तापमानाची नोंद होत आहे. त्यात काही ठिकाणी पावसाचा शिडकावा होत असल्याने उकाडा कमालीचा वाढला आहे. नागरिकांकडून यासाठी एसी, पंखे, कुलर, फ्रीजचा वापर वाढला आहे. त्यामुळे विजेची मागणीही साधारण वाढली आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी जिल्ह्याच्या कोणत्या ना कोणत्या भागात दररोज काही तासांसाठी वीजपुरवठा खंडित होत आहे. अतिरिक्त भार वाढत असल्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याचा दावा महावितरण करीत आहे, तर वाढलेल्या उष्णतेमुळे विद्युत रोहित्रांमधील तेल कमी होणे, काही यंत्रे नादुरूस्त होण्याचे प्रकार घडत असल्याने दुरूस्तीची कामे वाढली असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.



गेल्या काही दिवसांपासून सकाळ, दुपार, सायंकाळ असे वेळी-अवेळी वीजपुरवठा खंडित होत आहे.

रोहा, खालापूर, सुधागड, पोलादपूर परिसरात कायमच वीज गायब होत असल्याच्या तक्रारी आहेत. सकाळच्या वेळेत नागरिकांची कामावर जाण्याची गडबड आणि त्यात वीज गेल्याने कामे खोळंबून पडत आहे. दुपारी पुरवठा खंडित होत असल्याने उकाड्यात वाढ होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक हैराण होत आहेत. ऐन उन्हाळ्यात दुपारच्या वेळेत विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

**उष्णतेच्या लाटेत विजेचा वापर नक्कीच वाढला आहे. जिल्ह्यातील काही ठराविक भागातच हे दिसून येत आहे. तेथील पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कदाचित कमी वापर असलेल्या ठिकाणचा वीजपुरवठा बंद केलेला असेल. त्याचबरोबर वाढलेल्या तापमाणात यंत्रसामुग्रीही नादुरूस्ती होत असते. एप्रिलपासून दर मंगळवारी मान्सूनपूर्व कामांच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आलेले आहे. यात झाडांची छाटणी, विद्युत वाहिनींची दुरुस्ती केली जात आहे.**

**-ए. यू. मुलाणी, मुख्य कार्यकारी अभियंता, महावितरण, पेण**

# रोह्यात नगर परिषदेतर्फे मतदार जागृती रॅली

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, यासाठी निवडणूक प्रशासन जनजागृती करीत आहे. त्या अनुषंगाने रोहा शहरात नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या रॅलीला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



मतदार जनजागृती रॅलीत नगर परिषदेचे अधिकारी विशाल काळे, श्रीनिवास पाटील, अभियंता सुधीर भगत, रचना पार्टे, स्वप्नील तोडणकर, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष नंदलाल गुप्ता, रुपेश खराडे, निवृत्ती सुर्वे, वैशाली पवार आदींसह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या रॅलीला सकाळी ज्येष्ठ नागरिक सभागृह येथून सुरुवात करण्यात आली. दमखाडी नाका, सागर डेअरी, मेहेंदळे हायस्कूल, राम मारुती चौक, तीनबत्ती नाका ते नगरपालिका अशी काढण्यात आली. शेवटी उपस्थितांना शपथ देण्यात आली.

या रॅलीत रोहा अष्टमी नगर परिषदेचे कर्मचारी, अधिकारी, नगरपरिषदेच्या शाळेतील शिक्षक, दिव्यांग संघटनेचे सदस्य व बचत गटातील महिला सहभागी झाल्या होत्या.

# साळाव ते तळेखार रस्त्याची दुरवस्था

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव ते तळेखार रस्त्याची पुरती दुरवस्था झाली आहे. अनेकदा लहान-मोठे अपघात घडल्याने या रस्त्याची त्वरीत दुरूस्ती करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

शिवसेना मुरूड उपतालुका युवा अधिकारी विकी वेगस यांनी याबाबत मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन दिले आहे. या निवेदनासह त्यांनी साळाव ते तळेखारदरम्यान पडलेल्या खड्ड्यांचे छायाचित्रसुद्धा जोडले आहेत. या रस्त्याने साळाव जेएसडब्लू कंपनीची कंपनीतील मालवाहतूक ट्रक जा-ये करीत असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचा आरोप स्थानिक करीत आहेत.

साळाव ते बिर्ला मंदिरदरम्यानच्या रस्त्याची पुरती दुरवस्था झाली असून या रस्त्याला मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांचा सर्वांत जास्त त्रास दुचाकी, मिनीडोर चालकांना सहन करावा लागतो. खड्ड्यांमुळे अनेकदा लहान-मोठे अपघातही घडले आहेत.

साळाव बिर्ला मंदिरात नित्याने पर्यटक, भाविक मोठ्या संख्येने येत असतात, तसेच नजीकच नामांकित शाळा असल्याने या शाळेत अलिबाग व मुरूड तालुक्यातील विद्यार्थीही येत असतात. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.



# मुरूडमध्ये मुस्लिम समाज बांधवांची बैठक

## महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना पाठिंबा जाहीर

**मुरूड : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अतिक खतीब यांच्या निवासस्थानी सर्व मुस्लिम कार्यकर्त्यांची बैठक महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या बैठकीत मुस्लिम बांधवांनी खासदार सुनील तटकरे यांना पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले.



या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, मुस्लिम समाज माझ्यासोबत आहे हे आजच्या सभेवरून दिसून येत आहे. समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी पूर्वीही आग्रही होतो व यापुढेसुद्धा काम करणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.

माजी नगराध्यक्ष रहीम कबले यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. अंतुले साहेब यांच्यानंतर खासदार सुनील तटकरे यांनीच मुस्लिम समाजाचे प्रश्न सोडविले. त्यामुळे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. अतिक खतीब यांनी, मुस्लिम समाजाचे यापुढेसुद्धा तटकरे साहेब संसदेत विविध प्रश्न मांडून ते सोडवणार आहेत. यासाठी समाजाने त्यांना ताकद द्यावी व दिल्लीस पाठवावे, असे आवाहन केले.

प्रमुख नेते जहूर कादरी यांनी, वक्फ बोर्डाचा वाढलेला कर भरणे अशक्य होत आहे. यासाठी सदरचा कर कमी करून पूर्वीप्रमाणेच दोन टक्के ठेवावा अशी मागणी केली. यावर खासदार तटकरे यांनी निवडणुकीनंतर हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असे अभिवचन दिले.

व्यासपीठावर तालुकाध्यक्ष फैरोझ घलटे, सुपारी संघाचे संचालक मुअज्ज़म हसवारे, माजी नगराध्यक्ष रहीम कबले, जहूर कादरी, मुसद्दीक कादरी, समीर दौंनाक, जाहिद कादरी, अस्लम कादरी, बिलाल बागवान, माजी सभापती स्मिता खेडेकर, माजी नगरसेवक मनोज भगत, मुरूड शहराध्यक्ष संजय गुंजाळ, माजी सरपंच अजित कासार, रायगड जिल्हा सोशियल मीडिया प्रमुख हसमुख जैन, सचिव विजय पैर, योगेंद्र गोयजी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्व. संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य ज्येष्ठ पत्रकार स्व. संतोष पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी स्व. संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन येते. यंदा गुरुवारी (दि.२५) माथेरान येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यस्तरीय संपादक पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे, स्व. सुनील दांडेकर स्मृती जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार खोपोलीचे पत्रकार भाई ओव्हाळ तर स्व. धर्मानंद गायकवाड तालुकास्तरीय पुरस्कार माथेरान येथील पत्रकार अजय कदम यांना जाहीर करण्यात आला आहे.

माथेरान येथील रहिवासी आणि महाराष्ट्र राज्यात वावर असलेले ज्येष्ठ पत्रकार संतोष पवार यांचा कोरोना काळात विषाणूचा संसर्ग झाल्याने मृत्यू झाला होता. स्व. संतोष पवार हे पत्रकारांसाठी एक आदर्श होते. यासाठीच कर्जत प्रेस क्लबने त्यांच्या स्मृतीनिमित्त पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे. माथेरानमधील



प्रीती हॉटेल येथे हा सोहळा गुरुवारी सायंकाळी ५. ३० वा. पार पडणार असल्याचे अध्यक्ष राहुल देशमुख यांनी जाहीर केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असणार आहेत, तर प्रमुख पाहुणे म्हणून संपादक रवींद्र अंबेकर, ज्येष्ठ वृत्तनिवेदक भूषण करंदीकर, मराठी पत्रकार परिषद कार्याध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष मनोज खांबे, माथेरान नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, मनोज खेडकर, विवेक चौधरी, प्रेरणा सावंत, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे ॲड. कैलास मोरे आदी पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

# कर्जत शहरामध्ये पोलिसांचा रुट मार्च

**कर्जत : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलीस ठाणे हद्दीमधील शहराच्या मुख्य बाजारपेठेच्या ठिकाणी कर्जत पोलीस ठाण्याच्या माध्यमातून रुट मार्च काढण्यात आला.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक तसेच विविध धार्मिक सणामध्ये कर्जत तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी धुळा ज्ञानेश्वर टेले यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत पोलीस मैदानातून- डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक- बाजारपेठ-महावीर पेठ- जकात नका-कपालेश्वर मंदिर- कर्जत पोलीस ठाणे असा रुट मार्च काढण्यात आला.

या रुट मार्चसाठी कर्जत पोलीस ठाण्यामधील दोन अधिकारी, १६ अंमलदार व माणगांव आरसीपी प्लाटूनचे ३० अंमलदार, एसआरपीएफ प्लाटूनचे एक अधिकारी, १६ अंमलदार या रुट मार्चमध्ये सहभागी झाले होते.



# मुरूडमध्ये जाळ्यात अडकलेल्या मांजराला जीवदान

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड मसाल गल्लीमधील संजू मसाल यांच्या मागील वाडीत काळी मांजर (काळगा) जाळयात अटकल्याचे निर्देशनात आल्याने तत्काळ मसाल यांनी वनपाल विजू कोसंबे यांना भ्रमणध्वनीद्वारे माहिती दिली. वनपाल कोसंबे यांनी सर्पमित्र संदीप घरत यांना सोबत घेऊन घटनास्थळी येऊन जाळ्यात अटकलेल्या काळ्या मांजराला सुखरुप बाहेर काढले.

हे काळे मांजर साधारण सात वर्षांचे असून भक्ष्य शोधण्याच्या नादात या जाळ्यात ते अडकले. बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असताना त्याच्या मागच्या पायाला जाळ्याचा धागा लागून पायाला जखम झाली. जाळ्यातून बाहेर काढण्यासाठी जवळ गेल्यावर त्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला जाळ्यातून बाहेर काढण्यात यश आले. पशुवैद्यकीय डॉ. विनायक पवार यांनी या मांजराची तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार केले.


**एसटी. प्रवर्गासाठी फ्लॅट विकणे आहे.**

फ्लॅट क्र. २०२, बिल्डिंग नं. १, वास्तु विहार, के एच-१, सेक्टर-१६ खारघर, नवी मुंबई (क्षेत्रफळ कारपेट - ३०२-५८ स्के.फुट)

संपर्क :- अमित - ८६९८८८८८८८/९११२१११११११

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031088** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-14/ 2024-2025.** RFx E-tender for Hiring of MMV vehicle at EHV Substation Maint Sub Dn Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025....2nd call. **Tender amount Rs. 5,99,904/- , EMD amount Rs. 5,999/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **22.04.2024, 18:00 Hrs. to 29.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 29.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **30.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030775** **Tender No. :EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-74/ 2023 - 2024.** RFx e-tender for work of replacement of existing 6 Nos. 220kV post insulator structure at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel…**3rd call.** **Tender amount Rs. 1,82,375/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **22.04.2024, 18:00 Hrs. to 29.04.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 29.04.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **30.04.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**


# भातसई येथील महादेवी मातेचा यात्रोत्सव

**धाटाव : प्रतिनिधी**

हाकेला धावणारी, नवसाला पावणारी अशी ख्याती असणाऱ्या रोहा तालुक्यातील भातसई येथील श्री महादेवी मातेचा पालखी व यात्रोत्सव २२ व २३ एप्रिलदरम्यान साजरा होणार आहे. या उत्सवासाठी ग्रामस्थ व देवस्थान मंडळाकडून जय्यत तयारी सुरू आहे.

देवीच्या स्थानाबद्दल आख्यायिका सांगितली जाते. खूप वर्षांपूर्वी भातसई गावातील गुराखी गायी चारण्यासाठी तळ्याकाठी गेला असता, मिठकेश्वर जाळीजवळ महादेवी मातेने दर्शन दिले. तिने सांगितले, मी गावाच्या पूर्व दिशेला माळावर प्रगट झाली आहे. हे महादेवी मातेचे स्वयंभू स्थान आहे. तेथे मंदिराची उभारणी करण्यात आली. देवीचे भगत चिंतामणी सखाराम खरीवले आहेत. हा यात्रोत्सव दोन दिवस असतो. यात्रेला मिठाई, खेळणी, नवसाच्या काठ्या वाजत-गाजत मिरवणुकीने येत असतात. यात्रेचे वैशिष्ठ्य म्हणजे पाठीला गळ टोचून घेतले जातात.



या वर्षी सोमवारी (दि.२२) दुपारी १२ वा. पालखी मिरवणुकीला भातसई गावातील मंदिरातून सुरुवात होणार आहे. पालखीनंतर झोलांबे कोपरे या गावात जाते. त्यानंतर पालखी झोलांबे गाव, लक्ष्मीनगर येथे फिरवून सायंकाळी ७ वा. आदर्शगाव भातसई गावात घरोघरी फिरून महादेवी मंदिरात जाते.

दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.२३) महादेवी मातेचा यात्रोत्सवाला सुरुवात होते. सकाळपासून भक्त नवस घेऊन मंदिरात वाजत-गाजत येत असतात. यात्रेचा मुख्य कार्यक्रम म्हणजे गळ लावणे. यावर्षीचा गळ लावण्याच्या कार्यक्रमाला सायंकाळी ५.३० वा. सुरुवात होणार आहे. एकूण सहा भक्तांना गळ लावले जातात. त्यापैकी एक भक्ताचा वरचा गळ लाटेला लटकवून एक फेरी फिरवली जाते. या उत्सवासाठी निडी, कोपरे, झोलांबे लक्ष्मीनगर, वरवडे पालेतर्फे अष्टमी, आरे बुद्रुक, शेजारी गावातील मानाच्या काठ्या येतात.

# खालापुरात कंटेनर चालकाने मारला डल्ला

**खोपोली : प्रतिनिधी**

मॉलमध्ये पोहचविण्यासाठी दिलेल्या मालाचा कंटेनर चालकाने अपहार केल्याची घटना खालापूर हद्दीत घडली आहे.

एस.एस.के लॉजिस्टिक, विमाननगर, पुणे या कंपनीमार्फत टाटा या कंपनीचा माल त्यामध्ये शुज, चप्पल तसेच वेगवेगळ्या प्रकाराचे कपडे असा माल कंटेनर (एमएच ४३ बी एक्स ५३८७)मध्ये भरून कोरम मॉल ठाणे येथे खाली करण्याकरीता पाठविण्यात आला होता. कंटेनर चालकाने खालापूर कलोते गावचे हद्दीत रिंकी हॉटेलचे वाहनतळामध्ये चालकाने कंटेनरच्या दरवाजास लावण्यात आलेले सिल आहे त्याच स्थितीत ठेवून कंटेनरच्या उजवे बाजूकडील दरवाजा उघडून २४ हजार ७३१ रुपये किमतीचा माल काढून घेतला. याबद्दल कंटेनरचालकाविरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडक

### गुरुकुलमध्ये रामकाळ अवतरला



**मोहोपाडा** : येथील श्रीस्वामिनारायण गुरुकुलमध्ये श्री रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नवी मुंबई गुरुकुलचे संचालक परमपूज्य विश्वमंगलदास स्वामी, ब्रम्हस्वरूप स्वामी व मुख्याध्यापक डॉ. पी. हरीबाबू रेड्डी यांनी या उत्सवाचे आयोजन केले होते. सर्व लहान बालकांनी भगवान श्रीरामाची वेशभूषा परिधान केली होती. या वेळी श्रीरामाचा जयघोष झाला. प्रभू रामचंद्र भगवान की जय व जय स्वामिनारायण अशा जयघोषाने गुरुकुल परिसर दुमदुमदून गेला. विशेष म्हणजे भगवान श्रीरामाची सुंदर अशी वेशभूषा परिधान करून आलेल्या सर्व लहान बालकांनी आपल्याकडे लक्ष वेधून घेतले. सर्वांनी भक्तिमय नृत्य करून सर्व वातावरण प्रसन्न केले.

### स्वप्नाली कोळीची शिष्यवृत्तीसाठी निवड


**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील माध्यमिक मराठी विभागात शिक्षण घेत



असलेल्या स्वप्नाली जगन्नाथ कोळी या विद्यार्थिनीची नॅशनल मिन्स कम मेरिट स्कॉलरशिप स्कीम एक्झॅमिनेशन या शासकीय स्तरावरून घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून प्रतिवर्षी १२ हजार याप्रमाणे पाच वर्षे शिष्यवृत्ती देण्यात येते. माझ्या यशात माझ्या आई-वडिलांचा आणि विद्याभवन शाळेचा खूप मोठा वाटा आहे असे मत स्वप्नालीने व्यक्त केले. पुणे विद्यार्थीगृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव दिनेश मिसाळ तसेच सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी स्वप्नालीचे अभिनंदन केले.

### घणसोलीत बांधकामांवर कारवाई

**नवी मुंबई** : महानगरपालिका विभाग कार्यालयातर्फे



घणसोलीतील सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात आली. आशीर्वाद हॉस्पिटलसमोर मुख्य रस्त्यालगत जोत्याचे काम पूर्ण महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे काम सुरू होते, तसेच समर्थनगर येथे बांधकाम प्रगतीपथावर होते. नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे काम सुरू होते. या दोन ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांनी संयुक्त कारवाई केली. अनधिकृत बांधकाम पोकलेन मशिन्स व १० कामगार यांच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागातील अधिकारी, कर्मचारी व सिडको अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस पथक तैनात होते.

# नवी मुंबईत ठिकठिकाणी रस्त्यावर खोदकाम

### शहरभर वाहतूक कोंडी; नागरिक हैराण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या साडेचार वर्षांपासून नवी मुंबई मनपामध्ये प्रशासनराज आहे. शहरात शंभरहून अधिक ठिकाणी सध्या कोट्यवधींची विकासकामे सुरू असून त्याबरोबरच तेवढीच कामे निविदा प्रक्रियेत आहेत. हे चित्र समाधानकारक असले तरी अनेक ठिकाणी अनावश्यक कामे केली जात आहेत. ठिकठिकाणी रस्ते कोणत्या ना कोणत्या कारणासाठी खोदून ठेवण्यात आल्याने वाहतूक कोंडी सातत्याने होत आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.



शहरातील रस्त्यांच्या डावीकडील मार्गिकांचे डांबरीकरण केले जाते जेणेकरून इंटरनेट, टीव्ही, फोन, विद्युत वाहिन्या टाकणे वा काढणे, त्यांची दुरूस्ती सहज व कमी पैशात केली जावीत, मात्र नवी मुंबई शहरात या ठिकाणी डावीकडील मार्गिकेवरही सिमेंट काँक्रीटीकरण केले जात आहे. वाशी रेल्वेस्थानक ते ब्ल्यू डायमंड चौक या सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्याची डावीकडील मार्गिका उखडून त्यावर सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. याशिवाय प्रत्येक चौकाचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचा घाट नवी मुंबई महापालिकेने घातला आहे.

ऐरोलीत सेक्टर ३/८, वाशी सेक्टर १४, सीबीडी अशा बहुतांश ठिकाणी पदपथांचे पेव्हरब्लॉक आवश्यक काढण्यात आले व पुन्हा तेच पेव्हरब्लॉक बसवण्यात आले. कोपरखैरणे सेक्टर १९,१८,१७ अशा रेल्वेस्थानक परिसरातील पदपथांवरील पेव्हरब्लॉक उखडले असून अनेक ठिकाणी एक ते चार फूट खड्डे पडले आहेत, मात्र अशा ठिकाणी दुर्लक्ष केले जात आहे.

नेरूळ स्टेट बँक कॉलनीसमोरील सुस्थितीतील पदपथ उखडून काढण्यात आलेल पेव्हरब्लॉकच पुन्हा बसवण्यात आले आहेत. अशीच अवस्था रस्त्यांची आहे, त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

> **शहरातील कामे नियमानुसार सुरू आहेत. एखादा रस्ता चांगल्या स्थितीत दिसत असतो, मात्र शास्त्रोक्त पाहणी केली असता तो लवकरच खराब होणार असल्याचे निदर्शनास आले तर त्यावर थर दिला जातो. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे केली जात आहे.**
>
> **-संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई मनपा**

## सानपाडा डेपोतून बसेस पुन्हा सुरू कराव्यात; प्रवाशांची मागणी





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील एनएमएमटीचा बस डेपो हा प्रवाशांची वाट पाहत प्रतीक्षेत आहे. या डेपोतून सुटणाऱ्या बसेस मागील वर्षभरापासून बंद आहेत. त्यामुळे सानपाडा रेल्वेस्थानकातून बाहेर पडल्यावर प्रवाशांना रिक्षा अथवा पायी चालण्याशिवाय पर्याय नाही. डेपोतून पुन्हा बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी होत आहे.

सानपाडा रेल्वेस्थानकालगत पालिका परिवहनाचा हा डेपो आहे. सानपाडा येथील रहिवाशी प्रवाशांसाठी वाशी, तुर्भे, मुंबई तसेच पनवेल व इतर ठिकाणी जाण्यासाठी हा डेपो सोयीस्कर होता. सायन-पनवेल मार्गाला लागूनच हा डेपो असल्याने त्या ठिकाणाहून प्रतिदिन अनेक गाड्यांची ये-जा होत होती. या ठिकाणाहून पूर्वी १३ आणि ११ क्रमांकाच्या दोन बसदेखील सुटत होत्या. त्याकरिता या डेपोमध्ये तीन बस थांबे आहेत.

डेपोतून दिवसभरात किमान २० चालक-वाहक विश्रांतीसाठी येत असत. त्यांच्यासाठी परिवहनने निवाराशेडची सोय करून दिलेली होती, मात्र सध्य स्थितीत या डेपोतून एकही बस जात नसून सानपाडा रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यावर प्रवाशांना एक तर पायी अन्यथा रिक्षामधून प्रवास करावा लागत आहे.

एपीएमसी मार्केट हे आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ इथे असून हजारो प्रवासी रेल्वे स्थानकातून मार्केटमध्ये कामानिमित्त जात असतात. अशांना चांगला पर्याय परिवहन बससेवा असताना इथून एकही बस सुटत नसल्याने प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

सध्या या ठिकाणी कुत्री आणि मांजराने आश्रय घेतला असून दुपारच्या कडक उन्हात त्यांनी येथे आश्रय घेतल्याचे पहावयास मिळत आहे.

> **सानपाडा पूर्व रेल्वेस्थानक येथील बस डेपोमधून सध्या बसेस सोडल्या जात नाहीत. डेपोतून बससेवा सुरू करण्याचा निर्णय प्रशासनाच्या अखत्यारीत आहे.**
>
> **-उमाकांत जंगले, मुख्य वाहतूक अधिकारी, नवी मुंबई**







**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रासप, आरपीआय महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी प्रभाग १८चे माजी नगरसेवक तथा भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेविका निता माळी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन प्रचार केला.**

## नवी मुंबईत आज नमो संवाद कॉर्नर सभा

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जनतेशी संवाद साधावा याकरिता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार, बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली नमो संवाद कॉर्नर सभांचे नियोजन करण्यात आले आहे.

शनिवारी (दि.२०) शांतिवन सोसायटी सेक्टर-६ मार्केट सीबीडी, सायंकाळी ६ वा. ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र दिवाळे गाव, रविवारी (दि.२१) सायं. ६ वा. अमृतेश्वर तलावाजवळ मच्छिमार्केटसमोर सेक्टर-२० बेलापूर गाव, ई-वी होम्स मैदान सेक्टर-५० नवीन सीवूड्स, २६ एप्रिल रोजी सायं. ७ वा. नेरूळ पश्चिम रेल्वेस्टेशन, २७ एप्रिल रोजी सायं. ५ वा. राजीव गांधी ब्रिजजवळ सेक्टर-२ नेरूळ पश्चिम, सायं. ७ वा. सेक्टर-१५ चौक वाशी, २८ एप्रिल रोजी सायं. ६ वा. नेरूळ बस डेपो चौक सेक्टर-११ नेरूळ पूर्व, सायं. ७ वाजता बधाई कॉर्नर सानपाडा, २९ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता जुने वार्ड ऑफिस सेक्टर-२२ तुर्भे गाव अशा सभा होणार आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, राज्यभरामध्ये निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून छोट्या सभांच्या माध्यमातून आम्ही जनतेपर्यंत जाण्याचा प्रयत्न आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघामध्ये नमो संवाद कॉर्नर सभेकरिता वक्ते म्हणून स्थानिक आमदार मंदा म्हात्रे, महासचिव भाजप महाराष्ट्र विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

सभेमध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले कार्य म्हणजे गरीब जनतेकरिता प्रत्येक पैसा गरीब कल्याणासाठी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गासाठी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थामध्ये १० टक्के आरक्षण सुनिश्चित केले गेले.

आसाममधील सर्वात लांब बोगीबील पुलाचे बांधकाम आणि सुबनसिरी लोअर येथे दोन हजार मेगावॅटचा जलविद्युत प्रकल्प, आदिवासी आसाम शांतता करार आणि बोडो, नागा कार्बी शांतता कराराने ईशान्येत शांतता प्रस्थापित केली. अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिर असे अनेक सुविधांचा विकास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झाली आहे. या सर्वांचा अहवाल वक्ते सादर करणार आहेत.









**पनवेल : भाजपचे पनवेल विधानसभा विस्तारक अमरीश मोकल यांना वाढदिवसानिमित्त गुरुवारी मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारूशिला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## चित्र, रांगोळीतून विद्यार्थ्यांनी केली मतदानाविषयी जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

चला मतदान करण्यास पुढे येऊया, आपल्या देशाचा विकास करूया, अशी जनजागृती करणारी घोषवाक्ये लिहून त्याला अनुरुप चित्रे व रांगोळी रेखाटत नवी मुंबई महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी आपापल्या संकल्पना वापरत लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचे महत्त्व अधोरेखित केले.



ठाणे लोकसभा निवडणुकीचे मतदान २० मे रोजी होत असून त्या अनुषंगाने ऐरोली व बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या वतीने मतदार जनजागृतीचा राबविण्यात येत आहे. याकरिता शाळा व महाविद्यालयांमध्ये नानाविध उपक्रम नावीन्यपूर्ण रितीने राबविण्यात येत आहेत.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वीप कार्यक्रमांतर्गत शालेय पातळीवर मतदान जनजागृतीविषयक चित्रे व रांगोळी काढण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

महानगरपालिकेच्या ५७ प्राथमिक व २३ माध्यमिक अशा एकूण ८० शाळांसह २००हून अधिक खासगी शाळांमध्येही चित्रे व रांगोळीच्या माध्यमातून मतदान विषयक जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी लोकशाहीच्या सबलीकरणासाठी मतदान करावे, असे आवाहन करणाऱ्या संकल्पना चित्र व रांगोळीच्या माध्यमातून रेखाटल्या.

अनेक शाळांमध्ये पालकांनीही भेटी देऊन या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहीत केले, तसेच शिक्षकांमार्फत मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांचीही प्रशंसा करण्यात आली.

## सीवूड्समध्ये फ्लेमिंगो आढळले मृतावस्थेत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई फ्लेमिंगो सिटीत शुक्रवारी (दि.१८) पहाटे काही फ्लेमिंगो पक्षी पामबीच रोडवर आढळले. एनआरआय सिग्नलवर पाम बीचच्या सर्व्हिस रोडवर एक फ्लेमिंगो पक्षी तडफडताना आढळला. त्याला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे पक्षीप्रेमी हमराज खुराना यांनी सांगितले. काही वेळाने पक्षी खाली कोसळला आणि मृत पावल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी पक्षी बाजूला ठेवलेल्या एनआरआय पोलिसांना याबाबत अवगत केले.

हा हिट-अँड-रनचे प्रकार असल्याचे प्राथमिकरित्या निदर्शनास आले. खुराणा यांना पामबीच रस्त्यावर आणखी एक फ्लेमिंगो चालताना दिसला. याबाबत माजी नगरसेवक भरत जाधव यांनी सीवूड्स



एनआरआय परिसरात दोन मृत फ्लेमिंगो दाखवणारा व्हिडिओ पोस्ट केला आहे. फ्लेमिंगो त्यांच्या पाणथळ वस्तीतून बाहेर पडले आणि रस्त्यावर उतरले हे विचित्र आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले आणि पर्यावरण विभागाकडून चौकशीची मागणी केली.

बीएनएचएसचे उपसंचालक डॉ. राहुल खोत म्हणाले की, फ्लेमिंगो रस्त्यावर उतरल्याचे त्यांनी पहिल्यांदाच ऐकले. यासाठी पाठपुरावा आवश्यक आहे.

# सुनील तटकरेंना पुन्हा खासदार करण्याचा सुधागडातील महायुतीच्या नेत्यांचा निर्धार

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील परळी विभागात सुनील तटकरे यांच्या प्रचार सभांचा झंजावात सुरू असून महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रचारात जोमाने उतरले आहेत. ठिकठिकाणी गाव बैठका तसेच घरोघरी जाऊनदेखील प्रचार केला जात आहे. या अंतर्गत परळी येथे बैठक झाली. या वेळी महायुतीमध्ये सहभागी घटक पक्षांच्या नेत्यांनी सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीस शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सरचिटणीस गीता पालरेचा, दादा कारखानीस, समन्वय समिती अध्यक्ष अनुपम कुलकर्णी, शिवसेना सुधागड तालुका अध्यक्ष रवींद्र देशमुख, माजी सभापती पिठू डुमना, यशवंत पालवे, विठ्ठल सिंदकर, आरिफ मणियार, आलाप मेहता, उत्तमराव देशमुख, राकेश शिंदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुधागड एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेने राज्य आणि देशाला दिशा दाखवणारे मार्गदर्शक व्यक्तिमत्व घडविण्याचे काम केले. या संस्थेच्या वाईट काळात सुनील तटकरे यांनी दिलेले जे योगदान आहे, ते कुणीच कधीच विसरू शकत नाही. 'सुएसो'वरील कोट्यवधींचे कर्ज माफ करून हजारो विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडविण्याचे कार्य सुनील तटकरेंनी केले असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनी केले.



प्रकाश देसाई पुढे म्हणाले की, सुधागड एज्युकेशन सोसायटी या संस्थेवरील कोट्यवधींचे कर्ज शासनाच्या माध्यमातून माफ करून सुनील तटकरे यांनी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांचे याकामी अनंत उपकार आपल्या साऱ्यांवर राहिले आहेत. जर ही शैक्षणिक संस्था कर्ज बुडीत निघाली असती तर हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले असते. सुएसोमध्ये शिकलेले विद्यार्थी आज मोठ्या हुद्यावर आणि वरिष्ठ पदावर विराजमान झालेले आहेत.

असे लोकाभिमुख, जनमानसाची जाण असलेले नेतृत्व खासदार होऊन संसदेत जाणे, देशाच्या केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री होणे ही तुम्हा आम्हा सर्वांसाठी भाग्याची गोष्ट असे, असेही देसाई म्हणाले.

२०२४ची लोकसभा निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून देशाचे भवितव्य घडवायचे आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कणखर आणि सक्षम नेतृत्व म्हणून लोकमान्यता मिळाली आहे. महायुतीच्या ४०० पार जागा निवडून आणून आपल्याला नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा महाराष्ट्रात ४८पैकी ४५हून अधिक खासदार महायुतीचे जिंकून येतील. रायगडातून सुनील तटकरे यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे देसाई यांनी सांगितले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करून देशाला महासत्ता बनविण्याचे आहे. त्यामुळे रायगड लोकसभेचे उमेदवार सुनील तटकरे यांना मोठ्या मतांनी निवडून द्या.

भारताला विश्वगुरू करण्यासाठी आणि देशाला विकसित राष्ट्र बनविण्याकरिता सर्व पक्षभेद विसरून एकत्र या, असे आरिफ मणियार म्हणाले.

भाजप जिल्हा सरचिटणीस गीता पालरेचा म्हणाल्या, यंदाची लोकसभा निवडणूक देशाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यामुळे आपापसातील मतभेद, मनभेद दूर करून जास्तीत जास्त महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूया.

शिवसेनेचे अनुपम कुलकर्णी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीच्या उमेदवारांच्या पारड्यात सर्वाधिक मताधिक्य देण्यासाठी आम्ही ताकदीने काम करू, असे सांगितले. इतरांनीही मनोगत व्यक्त करून महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना विजयी करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

## रायगड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक निरीक्षकांचे संपर्क क्रमांक जाहीर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय निवडणूक आयोगाने रायगड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण), निवडणूक निरीक्षक (पोलीस) आणि निवडणूक निरीक्षक (खर्च) यांची नियुक्ती केली आहे. हे सर्व निवडणूक निरीक्षक संपूर्ण निवडणूक कालावधीत शासकीय अलिबाग विश्रामगृह येथे पूर्वनियोजित भेटीसाठी दुपारी १२ ते १ या वेळेत उपलब्ध असतील.

संजीव कुमार झा हे निवडणूक सर्वसाधारण निरीक्षक (संपर्क क्रमांक ९६९९९७६८११) आहेत. संपर्क अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता उपेंद्र दीक्षित आहेत. ते जिल्ह्यातील निवडणूक संबंधित सर्वसाधारण बाबी पाहतील.

जोयस लालरेम्मवी निवडणूक पोलीस निरीक्षक (९०२२७४२२४०) आहेत. त्यांचे संपर्क अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित गोळे आहेत. जिल्ह्यातील निवडणूक संबंधित कायदा व सुव्यवस्था विषयक बाबी पाहतील.

निवडणूक खर्च निरीक्षक धिरेंद्रमणी त्रिपाठी (९३७३३६४५३२) आहेत. सहाय्यक संचालक लोकल फंड प्रवीण वडगाये त्यांचे संपर्क अधिकारी आहे. ते निवडणूक खर्चविषयक बाबी पाहणार आहेत.

ही सर्व माहिती नागरिक व मतदारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

## लोणशी, रिळे शाळेत शैक्षणिक साहित्यवाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

शेअरिंग ॲण्ड सर्विंग पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट चेन्नई डिस्ट्रीब्यूशन ऑफ फ्री एज्युकेशनल इक्विपमेंट मुंबई यांच्या वतीने सविता आहेश शिंदे यांनी लोणशी आदिवासीवाडी व रिळे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप केले.



लोणशी शाळेत झालेल्या या साहित्य वितरण कार्यक्रमास मुख्याध्यापक कमलाकर धुळगुंडे, आहेश शिंदे, दिलीप भोणकर, प्रदीप पवार, शिक्षक नितीन भांगे; तर रिळे शाळेमध्ये उज्वला मस्के (धुळगुंडे), वर्षा शेळके आदी उपस्थित होते.

## माथेरान घाटात मिनीबस पडली बंद

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान येथे जाण्यासाठी निघालेली मिनीबस घाटात बंद पडली. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.

कर्जतहून सकाळी ८.१५ मिनिटांनी सुमारे ४० प्रवाशांना घेऊन निघालेली मिनीबस जुम्मापट्टीजवळ तीव्र चढाव असल्याने गरम होऊन घाटात बंद पडली. पर्याय म्हणून दुसरी बस मागवण्यात आली, पण तोपर्यंत प्रवाशांनी थांबून न राहता मिळेल त्या वाहनाने माथेरान गाठले.

अल्प दरात विद्यार्थी तसेच माथेरानच्या नागरिकांना तसेच रोज शासकीय नोकरीनिमित्त माथेरानला काम करणाऱ्या नागरिकांना सवलतीच्या दरात प्रवास करता यावा या करता शासनाने कर्जत, नेरळ, माथेरान अशी मिनीबस सेवा २००८ साली सुरू केली. सुरवातीच्या काळात सुरळीत असलेला या बससेवेला सध्या ग्रहण लागले आहे. जुन्या झालेल्या बस वारंवार घाटात गरम होऊन बंद पडत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणाहून पायी किंवा मिळेल त्या वाहनाने जादा पैसे खर्च करून माथेरान गाठावे लागत आहे.



## उपचारादरम्यान एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील एका ४० वर्षीय व्यक्तीचा पॅरालिसिस झटका आल्याने उपचारादरम्यान मुंबईतील जे.जे. रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेची खबर दिनेश धोंडू शिर्के (रा. मुंब्रा कॉलनी, जि. ठाणे) यांनी दिल्यावर घटनेची कागदपत्रे सर जे.जे मार्ग मुंबई येथून प्राप्त झाल्यावर माणगाव पोलीस ठाण्यात नोंद दाखल करण्यात आली आहे.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळेलेली अशी की, मयत व्यक्तीचे नाव मारूती धोंडू शिर्के (वय ४०, रा. हातकेली, ता. माणगाव) असे असून त्यांना पॅरालिसिसचा झटका आल्याने उपचाराकरिता मुंबईतील जे.जे. रुग्णालयात नेण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे.


## पालीत भटक्या कुत्र्यांची दहशत

### पाच ते सहा जणांना चावा ▌ नागरिकांसह भाविक हैराण

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत चालली आहे. येथील एकता पथमध्ये एका पिसाळलेल्या कुत्रीने तब्बल पाच ते सहा जणांना चावा घेतला. भटके कुत्रे टोळ्यांनी सर्वत्र फिरत असतात. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भविकही या भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवामुळे हैराण झाले आहेत.

पाली हे अष्टविनायकांपैकी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. बल्लाळेश्वराचे दर्शनासाठी रोज असंख्य भाविक येत असतात. त्यामुळे पालीतील नागरिकांसह भाविकांनादेखील या भटक्या व मोकाट कुत्र्यांचा धोका आहे. मोठ्या झुंडीमध्ये फिरणारे कुत्रे पाहून नागरिक व भाविक भयभीत होत आहेत. येथील कचराकुंड्या, रस्त्यावरील कचरा आणि उकिरड्यावरील खरकटे अन्न यावर भटक्या कुत्र्यांचे पालन पोषण होत असल्याचे चित्र दिसत आहे.



सुदैवाने पाली व जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीजच्या लस उपलब्ध आहेत, परंतु अशा मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांबाबत प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी नागरिक व भाविक करीत आहेत.

**पाली व जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात अँटी रेबीज इंजेक्शन आवश्यक प्रमाणात उपलब्ध आहेत. नागरिकांनी कुत्रा चावल्यास लागलीच जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन अँटी रॅबीचे इंजेक्शन घ्यावे.**

**-डॉ. शशिकांत मढवी, तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड**

## आदिवासी विद्यार्थ्यांची ऐतिहासिक रायगडावर सहल; 'वेध सह्याद्री'चा मोफत उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

वेध सह्याद्री संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त वनवासी विकास आश्रम शाळा जांभिवली येथील आदिवासी विद्यार्थ्यांना विनामूल्य रायगड किल्ल्यावर भ्रमंती करण्यासाठी सहल आयोजित करण्यात आली होती.

वेध सह्याद्री ही संस्था गडकिल्ले संरक्षण, संवर्धन, जतन स्वच्छता मोहीम असे उपक्रम गेले कित्येक वर्षे राबवित आहेत. किल्ले रायगडावर जाऊन आलेला व्यक्ती एक सकारात्मक ऊर्जा आणि विचार घेऊन येतो. ज्या मुलांच्या आयुष्यात अनेक संकट आहेत, शैक्षणिक परिस्थिती, आर्थिक परिस्थितीमुळे ज्यांना आपल्या आयुष्यात अनेक अडचणी आहेत आशा आदिवासी मुलांच्या मनात सकारात्मक ऊर्जा यावी तसेच शिवछत्रपतींच्या इतिहासातून प्रेरणा घेता यावी म्हणून 'वेध सह्याद्री'मार्फत आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना विनामूल्य दुर्गदुर्गेश्वर रायगड दर्शनासाठी नेण्यात आले.

रायगडावर एका एका वस्तूचे दर्शन घेत असताना सर्व मुलांचा उत्साह वेगळ्याच उंचीवर होता. गड फिरत असताना सायंकाळचे ७.३० वाजले तरीसुद्धा सर्व मुल अत्यंत उत्सहाने आपल्या राजांचा गड पाहत होते. आदिवासी, गरीब विद्यार्थ्यांना रायगड किल्ल्यावरील घेऊन गेलो त्यावेळी त्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील तेज आणि हास्य हेच आमच्या मोहिमेचे खरे यश आहे, असे 'वेध सह्याद्री'चे संस्थापक घरडे यांनी या वेळी सांगितले.



## रोह्यात २० व २१ एप्रिलला शाह बाबा दर्ग्याचा उरुस

### हिंदू-मुस्लिम बांधवांच्या ऐक्याचे प्रतिक

**धाटाव : प्रतिनिधी**

हिंदू-मुस्लिम बांधवांच्या ऐक्याचे प्रतिक समजले जाणाऱ्या रोहा शहरातील प्रसिद्ध गाझी शेख सलाऊद्दीन शाह बाबा दर्गाचा उरुस २० व २१ एप्रिल रोजी साजरा होणार आहे. यानिमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये कव्वालीचे जंगी सामनेही रंगणार आहेत.



या दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमात हजारो हिंदू-मुस्लिम बांधव शाह बाबांचे दर्शन घेतात. बाबांच्या श्रद्धेपोटी शहरातून वाजतगाजत रातीब मिरवणूक काढतात. या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती उरुस कमिटीचे अध्यक्ष नसीम महाडकर यांनी दिली.

उरुसात लहान मुलांचे विविध खेळण्याची दुकाने, आकाश पाळणे, मिठाई दुकाने, विविध खाद्य पदार्थ, महिला व गृहोपयोगी वस्तू विक्रीची दुकाने लागतात व यामध्ये लाखो रूपयाची उलाढाल होत असते.

या उरुस कार्यक्रमात सर्व हिंदू-मुस्लिम बांधव व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड. राजीव साबळे यांची शिवसेना प्रवक्तेपदी नियुक्ती

### माणगावमध्ये आनंद व्यक्त; अनेकांकडून अभिनंदन

**माणगाव : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खंदे समर्थक, पालकमंत्री उदय सामंत आणि आमदार भरत गोगावले यांचे विश्वासू ॲड. राजीव साबळे यांची शिवसेनेचे प्रवक्ते म्हणून रामनवमीच्या मुहूर्तावर नियुक्ती करण्यात आली आहे. तसे लेखी पत्र आमदार गोगावले यांनी ॲड. साबळे यांना दिले.

ॲड. राजीव साबळे हे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सह्याद्री पतसंस्थेचे अध्यक्ष, सह्याद्री बझारचे अध्यक्ष म्हणूनही कार्य करीत आहेत. त्यांनी विधान परिषदेची उमेदवारी लढवलेली आहे. शिक्षण आणि सहकार क्षेत्रात कामगिरी केली आहे.

ऐन निवडणुकीच्या काळात ॲड. साबळे यांना हे महत्त्वाचे पद मिळाल्याने मागणगावमधील शिवसैनिकांमध्ये उत्साह संचारला आहे. याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप नेत्यांनीही त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव परिसरात मोठे मताधिक्य मिळेल, असा विश्वास या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख महेंद्र माणकर यांनी व्यक्त केला.



# मुंबईचा पंजाबवर रोहमर्षक विजय

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्ज संघाचा नऊ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने सूर्यकुमार यादवच्या आक्रमक अर्धशतकाच्या जोरावर निर्धारित २० षटकांमध्ये सात बाद १९२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पंजाबचा संघ १९.१ षटकांत १८३ धावांवर गारद झाला.

या सामन्यात पंजाब संघाचा जरी पराभव झाला असला तरी त्यांच्या प्रत्येक खेळाडूची संघाला विजय मिळवून देण्यासाठी सुरू असलेली धडपड वाखाणण्याजोगी होती. त्यात पंजाब किंग्सचा आशुतोष शर्मा व शशांक सिंह यांचे कौतुक करावे तितके कमीच आहे. या दोन्ही खेळाडूंमुळे पंजाबने मुंबईकडून सामना जवळपास हिसकावून घेतल्यासारखा होता, मात्र शेवटच्या ओव्हरमध्ये मोहम्मद नबी आणि इशान किशन या जोडीने अत्यंत हुशारीने या जोडीला चमत्कार घडविण्यापासून रोखले.

शिखर धवनच्या गैरहजेरीत पंजाबी सुरुवात पुन्हा एकदा निराशानजक झाली. कर्णधार सॅम कुरन (६), प्रभसिमरन सिंग



(०), लिएम लिव्हिंगस्टन (१), रिली रोसूव (०) लवकर बाद झाले. पंजाबचे ४ फलंदाज १४ धावांत माघारी परतल्यानंतर हरप्रीत भाटीया हा इम्पॅक्ट खेळाडू म्हणून आला आणि शशांक सिंगसह त्याने डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण हरप्रीतही (१३) जास्त काळ टिकू शकला नाही.

५ बाद ४९वरून पंबाजचे पुनरागमन अशक्यच वाटत होते, पण शशांक व आशुतोष ही जोडी जमली. जसप्रीत बुमराहने शशांकला (४१ धावा, २५ चेंडू, दोन चौकार व तीन षटकार) बाद करून मुंबईला पुन्हा यश मिळवून दिले. दुसरीकडे आशुतोषने २३ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. पंजाबला ३० चेंडूंत ५२ धावा करायच्या होत्या. आकाश मढवालने १६व्या षटकात २४ धावा दिल्याने सामना पंजाबच्या बाजूने झुकला. १८व्या षटाकत आशुतोष २८ चेंडूंत दोन चौकार व सात षटकारांसह ६१ धावांवर बाद झाला.

शेवटच्या ओव्हरमध्ये पंजाबला विजयासाठी १२ धावांची गरज होती. वेगवान गोलंदाज आकाश मधवाल मुंबई इंडियन्ससाठी पंजाब किंग्जच्या डावातील शेवटचे षटक टाकत होता. त्या वेळी कागिसो रबाडाने ओव्हरच्या पहिल्या चेंडूवर शॉट खेळून दोन धावा काढण्याचा प्रयत्न केला, पण हे काम त्याला यशस्वीपणे पार पाडता आले नाही. मोहम्मद नबीने बाउंड्रीजवळील चेंडूवर वेगाने उडी मारली आणि वेगवान थ्रो फेकला. नबीचा तो अचूक थ्रो ईशान किशनने शानदारपणे झेलला आणि तो चेंडू झटपट विकेटवर मारला.

रबाडा क्रीजवर पोहचल्याचे दिसत होते, पण रिप्ले पाहिल्यावर काय घडले ते समोर आले. कागिसो रबाडा धावबाद झाला आणि मुंबई इंडियन्सने हा सामना नऊ धावांनी जिंकला.

तत्पूर्वी, रोहित शर्मा (३६) आणि सूर्यकुमार यादव यांनी चांगली फटकेबाजी केली. त्यांनी दुसऱ्या विकेटसाठी ५७ चेंडूंत ८१ धावा जोडल्या. रोहितच्या विकेटनंतर मुंबईच्या धावांची गती संथ करण्यात पंजाबच्या गोलंदाजांना यश आले. सूर्याने ५३ चेंडूंत सात चौकार व तीन षटकारांसह ७८ धावा केल्या. हार्दिक पांड्या (१०) अपयशी ठरला. तिलक वर्मा व टीम डेव्हिडने (१४) चांगली फटकेबाजी करून मुंबईला ७ बाद १९२ धावांपर्यंत पोहचवले. तिलक १८ चेंडूंत दोन चौकार व दोन षटकारांसह ३४ धावांवर नाबाद राहिला. पंजाबकडून हर्षल पटेलने तीन, तर सॅम कुरनने दोन विकेट्स घेतल्या.

# तिलक वर्माने आयपीएलमध्ये केला षटकारांचा पराक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स संघाने आयपीएलमधील आपल्या सातव्या सामन्यात तिसरा विजय मिळवला. पंजाब किंग्जविरुद्धच्या या सामन्यात मुंबई संघाकडून चमकदार फलंदाजी पहायला मिळाली, ज्यात सूर्यकुमार यादवने ७८ धावांची खेळी केली, तर डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजीला आलेला युवा डावखुरा फलंदाज तिलक वर्मानेही दमदार फटकेबाजी केली. आपल्या या खेळीच्या जोरावर तिलकने आयपीएलमधील विशेष यादीतही आपले स्थान निर्माण केले.

तिलक वर्माने दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १८ चेंडूंत ३४ धावांची नाबाद खेळी करीत संघाची धावसंख्या १९०च्या पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यासह



त्याने आपल्या आयपीएल कारकिर्दीत ५० षटकारही पूर्ण केले. वयाच्या २१व्या वर्षी आयपीएलमध्ये ५० षटकारांचा आकडा गाठणारा तिलक आता ऋषभ पंतनंतरचा दुसरा खेळाडू ठरला आहे. पंतने वयाच्या २१व्या वर्षापर्यंत आयपीएलमध्ये ९४ षटकार ठोकले होते, तर तिलक वर्मा ५० षटकारांसह या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. तिसऱ्या स्थानावर राजस्थान रॉयल्स संघाचा भाग असलेला सलामीवीर यशस्वी जैस्वाल आहे. वयाच्या २१व्या वर्षापर्यंत त्याने ४८ षटकार मारले होते.

यंदा आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स संघासाठी आतापर्यंतचा प्रवास चांगला नसला तरी तिलक वर्माने आपल्या फलंदाजीने सर्वांना प्रभावित केले आहे. सात डावात तिलकने ४१.६०च्या सरासरीने २०८ धावा केल्या आहेत, ज्यात एका अर्धशतकाचाही समावेश आहे. या काळात तो दोनदा नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतला. तिलकच्या आयपीएल कारकिर्दीवर नजर टाकली, तर त्यांनी ३२ सामन्यांत ३९.५च्या सरासरीने ९४८ धावा केल्या आहेत, ज्यात चार अर्धशतकांचा समावेश आहे.

# आशुतोष शर्माची आयपीएलमध्ये दमदार कामगिरी

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये आशुतोष शर्माने पंजाब किंग्सकडून खेळताना सातत्याने कामगिरी करीत आपल्या खेळाने सर्वांनाच प्रभावित केले आहे. पंजाब किंग्सची कामगिरी या मोसमात साधारण राहिली असली तरी आशुतोष शर्माने मात्र सर्वांची मने जिंकली आहेत. मुंबई इंडियन्सविरूद्धच्या सामन्यात वादळी फलंदाजी करीत त्याने संघावर दबाव आणला, पण थोडक्यासाठी संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. मुंबईविरुद्धच्या ६१ धावांच्या खेळीसह आशुतोषने आयपीएलच्या १७ वर्षांच्या इतिहासातील मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात आशुतोषला आयपीएलमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली. त्यानंतर आठव्या क्रमांकावर फलंदाजी करीत त्याने



आतापर्यंत चार डाव खेळले आहेत. या दरम्यान आशुतोषने आतापर्यंत ५२च्या सरासरीने १५६ धावा केल्या आहेत, तर मुंबई इंडियन्स विरुद्धच्या सामन्यात त्याच्या ६१ धावांची शानदार खेळी केली.

आशुतोष शर्मा आयपीएलच्या १७ वर्षांच्या इतिहासात आठव्या क्रमांकावर खेळताना एका हंगामात १००हून अधिक धावा करणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. राशिद खाननंतर आयपीएलमध्ये अशी कामगिरी करणारा आशुतोष हा दुसरा खेळाडू आहे. त्याच्या आधी २०२३मध्ये खेळल्या गेलेल्या मोसमात राशिद खानने आठव्या क्रमांकावर किंवा त्याखालील स्थानावर फलंदाजी करताना १००हून अधिक धावा केल्या होत्या.

आशुतोषने या मोसमात आतापर्यंत चार डावांमध्ये २०५.२६च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याच्या बॅटमधून नऊ चौकार आणि १३ षटकार पहायला मिळाले. या हंगामासाठी झालेल्या खेळाडूंच्या लिलावादरम्यान पंजाब किंग्ज संघाने आशुतोषला २० लाख रुपयांच्या मूळ किमतीसह संघाचा भाग बनवले होते.

# रोहितने सांभाळले मुंबई संघाचे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने अटीतटीच्या सामन्यात पंजाब किंग्सचा नऊ धावांनी पराभव केला. १९३ धावांचा बचाव करताना मुंबईने पंजाबला १८३ धावांत रोखले, पण या विजयामध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला. अखेरच्या चार ते पाच षटकांमध्ये आशुतोष शर्माने पंजाबच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या. पंजाब सामन्यात वरचढ झाल्यानंतर हार्दिक पांड्या गांगरल्यासारखा झाला होता, पण अनुभवी रोहित शर्मा धावून आला.

रोहितने अखेरच्या काही षटकांत मुंबईची सुत्रे हातात घेतली. गोलंदाजीत बदल केले. क्षेत्ररक्षणातही महत्त्वाचे बदल करीत मुंबईला विजय मिळवून दिला. या विजयानंतर मुंबईच्या खेळाडूंनी एकच जल्लोष केला. रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांनीही आनंद व्यक्त केला. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत डी. गुकेश संयुक्त दुसऱ्या स्थानावर

**टोरंटो : वृत्तसंस्था**

भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेच्या ११व्या फेरीत अग्रमानांकित फॅबियानो कारूआना याच्याविरुद्ध ड्रॉनंतर संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर घसरला आहे, तर भारताच्या आर. प्रज्ञानानंदा आणि विदित गुजराती यांना पराभवाचा सामना करावा लागला.

प्रज्ञानानंदाला अमेरिकेच्या हिकारू नाकामुरा आणि गुजरातीला रशियाच्या इयान नेपोम्नियाश्चिने पराभूत केले. अन्य सामन्यांत फ्रान्सच्या फिरोजा अलीरजाने अझरबैजानच्या निजात अबासोव याला पराभूत केले. स्पर्धेत आता तीन फेऱ्या शिल्लक आहेत आणि नेपोम्नियाश्चि सलग तिसऱ्यांदा विजेतेपदाचा प्रबळ दावेदार ठरत आहे. रशियावर बंदी घालण्यात आल्यामुळे तो फिडेच्या ध्वजाखाली खेळत आहे. त्याने ११पैकी सात गुण मिळवून आघाडी घेतली आहे. कारूआना, नाकामुरा आणि गुकेश त्याच्यापेक्षा अर्ध्या गुणाने पिछाडीवर आहे. प्रज्ञानानंदाचे ५.५ आणि गुजरातीचे पाच गुण आहेत.

महिला गटात चीनच्या झोंग्यी तान हिला एकेरी आघाडी मिळाली आहे. चीनचीच टी लेइ दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारताच्या आर. वैशालीने अग्रमानांकित रशियाच्या अलेक्झांड्रा गोरियाश्किना हिला पराभूत केले, तर कोनेरू हम्पीने बल्गेरियाच्या नूरगुल सलीमोवा हिला पराभूत केले.

# आकाश मधवालने हार्दिककडे दुर्लक्ष करून ऐकला रोहित शर्माचा सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने गुरुवारच्या सामन्यात पंजाब किंग्जवर रोमहर्षक विजय मिळवला. शेवटचे षटक सुरू होण्याआधी आकाश मधवाल याला गोलंदाजीसाठी आणण्यात आले. त्या वेळेचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसतोय.

पंजाब किंग्सला शेवटच्या षटकात १२ धावांची गरज होती. मुंबई इंडियन्सकडून

**व्हिडीओ व्हायरल**



आकाश मधवाल याला शेवटचे षटक टाकण्यासाठी पाचारण करण्यात आले. षटक सुरू करण्याआधी आकाश हा रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांच्याबरोबर उभा होता.

चेंडू कुठे टाकावा, फिल्डिंग कशी असावी यावर त्यांची चर्चा सुरू होती, पण व्हिडीओमध्ये नीट पाहिल्यास, आकाश हा हार्दिक पांड्याने सांगितलेले काही ऐकत नसून रोहित शर्माकडे पूर्णपणे लक्ष देत होता. आकाशने हार्दिकला पूर्णपणे दुर्लक्षित करून रोहितचा सल्ला मानला अशा प्रकारची ट्विट्स सोशल मीडियावर फॅन्सकडून केली जात आहेत.

# मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याला दंड



**मुंबई : प्रतिनिधी**


पंजाब किंग्सच्या हातून सामना खेचून आणल्यावर आनंद साजरा करीत असतानाच मुंबई इंडियन्सच्या कर्णधाराला बीसीसीआयने दंड ठोठवल्याचे समजतेय. आयपीएलच्या आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी मुंबई इंडियन्स दोषी आढळल्यानंतर कर्णधार हार्दिक पांड्याला त्याची भरपाई करावी लागली.

सामन्यानंतर बीसीसीआयने शेअर केलेल्या प्रेसरिलीजमध्ये म्हटल्याप्रमाणे, मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला १८ एप्रिल रोजी मुल्लापूर येथील स्टेडियमवर पंजाब किंग्जविरुद्ध झालेल्या आयपीएल सामन्यात स्लो ओव्हर रेट राखल्यामुळे दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलच्या किमान ओव्हर रेट नियमांच्या संबंधित आचारसंहितेअंतर्गत हा त्याच्या संघाचा हंगामातील पहिला गुन्हा असल्याने पांड्याला १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# कॉलेज विद्यार्थ्यांसाठी कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्स व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे २६ एप्रिलपासून ज्युनियर व सिनियर कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी विनाशुल्क एकेरी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. पहिल्या आठ विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. ही स्पर्धा सर्व कॉलेज खेळाडूंसाठी मोफत खुली असून चेंबूर-पश्चिम येथील श्री नारायण गुरु कॉलेजच्या



जिमखान्यात रंगणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेल्या श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्सतर्फे विविध खेळांना प्रोत्साहन देतांना त्या खेळातील कौशल्य व नियमांची संपूर्ण माहिती क्रीडापटूंना देण्यावर भर दिला जातो. हा उपक्रमात स्पर्धात्मक खेळाबरोबर खेळाचे तंत्र व नियमांचे मार्गदर्शनदेखील होणार आहे.


स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी किंवा अधिक माहितीसाठी प्रा पूनम मुजावर (८३६९१५५२७१) अथवा क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक (९००४७५४५०७) यांच्याकडे २१ एप्रिलपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चाहत्याची पोस्ट शेअर करून नबीचा कर्णधार पांड्यावर निशाणा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा कर्णधार बनवला गेल्यापासून हार्दिक पांड्याला चाहत्यांच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. यंदाच्या आयपीएलमधील प्रत्येक सामन्यात चाहते हार्दिक विरोधी नारे देताना दिसत आहेत. रोहित शर्मा व विराट कोहली या भारतीय क्रिकेटमधील दोन दिग्गज खेळाडूंच्या विनंतीनंतरही प्रेक्षकांनी हार्दिकला ट्रोल केलेले थांबवले नाही. आता मुंबई इंडियन्सचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे पहायला मिळतेय.

हार्दिकच्या निर्णयावर टीका करणारी पोस्ट मुंबई इंडियन्सच्या संघातील एका खेळाडूने त्याच्या इन्स्टा स्टोरीवर शेअर केल्याने हा



वाद समोर आला आहे. मुंबई इंडियन्सने गुरुवारी रोमहर्षक लढतीत नऊ धावांनी पंजाब किंग्सवर विजय मिळवला. या सामन्यात अफगाणिस्तानचा स्टार खेळाडू मोहम्मद नबी याला एकही षटक फेकण्यास दिले गेले नाही. त्यावर त्याच्या एका चाहत्याने जोरदार टीका केली आणि नबीने ही पोस्ट शेअर केली. त्याला षटक तर मिळाले नाहीच, शिवाय मुंबईच्या डावातील एक चेंडू शिल्लक असताना तो फलंदाजीला आला. आपल्या आवडत्या खेळाडूला मिळालेली वागणूक पाहून चाहता संतापला आणि त्याने हार्दिक पांड्याच्या निर्णयावर टीका केली.

'आमच्या कर्णधाराचे काही निर्णय आश्चर्यचकीत करणारे होते आणि त्यामुळे चाहत्यांना धक्का बसला. नबीला एकही षटक दिले गेले नाही,' असे त्या चाहत्याने लिहिले होते आणि नबीने ही पोस्ट शेअर केली.



पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली न्हावाखाडी गावात भाजपचे अरुण ठाकूर, सी.एल. ठाकूर, सदानंद ठाकूर आदींनी प्रचार केला.



पनवेल : महापालिका प्रभाग क्रमांक १७मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या उपस्थितीत प्रचार करण्यात आला. या वेळी अनुसूचित जाती मोर्चा शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, झोपडपट्टी सेल उत्तर रायगड जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर, बूथ कमिटी अध्यक्ष अनिल साळवी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सब ज्युनिअर, ज्युनिअर, क्लासिक आणि इक्विप पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडची जिल्हास्तरीय सब ज्युनिअर, ज्युनिअर (मुले-मुली), क्लासिक आणि इक्विप स्पर्धा रविवारी (दि.२१) नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

सर्व गटांच्या वजनाची वेळ सकाळी ९.१५ ते ९.४५ अशी असून उशिरा येणाऱ्या स्पर्धकांचा विचार केला जाणार नाही. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी १० वाजता होईल. स्पर्धेचे ठिकाण नवीन पनवेल सेक्टर ५ येथील श्री वृंदावन बाबा सभागृह, गुरुद्वाराच्या बाजूला असे आहे. स्पर्धा धार्मिक आवरात असल्यामुळे तिथे पावित्र्य आणि स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

स्पर्धेसाठी योग्य तो गणवेश आवश्यक आहे. पंचांचा निर्णय अंतिम राहील याची नोंद सर्व खेळाडू, प्रशिक्षक यांनी घ्यावी, असे पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सहसचिव सचिन भालेराव (९८७०९६२२८८) यांनी कळविले आहे.

# बॉयफ्रेंडसोबत दिसली 'नॅशनल क्रश' स्मृती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना तिच्या खेळीमुळे तर प्रसिद्ध आहेच, पण ती तिच्या सौंदर्यामुळेदेखील चाहत्यांच्या मनावर राज्य करते. तिचे लाखो चाहते आहेत. स्मृतीची एक झलक पाहण्यासाठी आतुर असलेल्या चाहत्यांनी आता मात्र 'नॅशनल क्रश'ची फिरकी घेतल्याचे दिसते.

**नेटकऱ्यांची फटकेबाजी**



काही महिन्यांपूर्वी महिला प्रीमिअर लीगमध्ये स्मृती मानधनाच्या नेतृत्वात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने किताब जिंकला. स्पर्धेच्या दुसऱ्याच हंगामात आरसीबीला ट्रॉफी जिंकण्याची किमया साधता आली.

दरम्यान, स्मृती मानधनाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती बॉयफ्रेंड पलाश मुच्छलसोबत दिसत आहे. स्मृतीच्या व्हिडीओचा दाखला देत चाहते भन्नाट कमेंट्स करीत आहेत. काहींनी तर तिच्या निवडीवर प्रश्न उपस्थित करीत प्रतिक्रिया दिल्या. खरेतर टीम इंडिया आगामी काळात बांगलादेशविरूद्ध पाच सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे. यासाठी भारतीय संघ बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे.

पलाश हा इंदौरचा रहिवासी असून तो पेशाने एक गायक आहे. गतवर्षी २०२३मध्ये स्मृती आणि पलाश दोघांच्या रिलेशनशीपचे वृत्त माध्यमांत आले. पलाशने एका लाईव्ह कॉन्सर्टमध्ये गाणे गाऊन ते स्मृतीला डेडिकेट केले होते, तर आय लव्ह यू टू स्मृती असेही त्याने म्हटले होते. महिला प्रीमिअर लीगमध्ये चॅम्पियन झाल्यानंतर दोघांमधील प्रेमाची जादू की झप्पी पहायला मिळाली होती.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com